POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२६७ ● मुंबई, शनिवार, ०२ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



नाशिकमध्ये घडलेल्या भोंदू अशोक खरात प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. मात्र, या घटनेमुळे पीडितांना आवाज उठवण्याची हिंमत मिळाली असून, मागील ३० दिवसांत अंनिसच्या प्रयत्नांतून १४ भोंदूबाबांवर कारवाई करण्यात आली आहे.

## महिनाभरात चौदा 'बाबां'चा उठला बाजार

### 'खरात' प्रकरणानंतर भोंदूंचा बुरखा फाटला... लैंगिक शोषणासह आर्थिक लुटीचे प्रकार उघड

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

नाशिकमध्ये घडलेल्या भोंदू अशोक खरात प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. मात्र, या एका घटनेने राज्याच्या कानाकोपऱ्यातील पीडित महिला आणि पुरुषांना अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची मोठी हिंमत दिली आहे. याचेच फलित म्हणून, मागील अवघ्या ३० दिवसांत म्हणजेच महिनाभरात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) प्रयत्नांतून राज्यभरात तब्बल १४ भोंदूबाबांचे बाजार उठले असून त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या १८ वर्षांच्या अथक संघर्षानंतर २०१३ मध्ये 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा, जादूटोणा व त्याचे समूळ उच्चाटन अधिनियम २०१३' हा कायदा राज्यात अस्तित्वात आला. हा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले असले, तरी, आजही ग्रामीण भागांपासून ते शहरी भागांपर्यंत भोंदूगिरीचे पेव फुटले असल्याचे या ताज्या घटनांवरून स्पष्ट होत आहे. या भोंदूबाबांनी महिलांचे लैंगिक शोषण करण्यासोबतच लोकांची मोठी आर्थिक लूट केल्याचे समोर आले आहे.

**पीडितांनी न घाबरता पुढे यावे...**

खरात प्रकरणानंतर पीडित महिलांना लढण्याची हिंमत निर्माण झाली आहे. त्यांना न्यायाची अपेक्षा वाटू लागली आहे. काही ठिकाणी उत्स्फूर्तपणे तर काही ठिकाणी अंनिसच्या मदतीने गुन्हे दाखल झाले आहेत. आणखी पीडितांनी न घाबरता पुढे यावे, अंनिस त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे, असे आवाहन अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांनी केले आहे.

**शांत राहणे म्हणजे गुन्हेगारांना प्रोत्साहन...**

भय आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या भीतीने अनेक पीडित आजही समोर येण्यास घाबरत आहेत. मात्र, अशा प्रकरणांमध्ये आता शांत राहणे म्हणजे गुन्हेगारांना प्रोत्साहन देणे आहे, असे मत अंनिसच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे. अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे, बुवाबाजी संघर्ष विभाग कार्यवाह ॲड. रंजना गवांदे आणि सहकार्यवाह विष्णू लोणारे यांनी पीडितांना न घाबरता पोलिसांकडे तक्रार करण्याचे आवाहन केले आहे.

### महिनाभरात गजाआड झालेले 'भोंदू' :

- अशोक कुमार खरात - नाशिक
- गडगेबाबा (राजेंद्र गडगे) संगमनेर, अहिल्यानगर
- चेतन सुनील माळी - मूर्तिजापूर, अकोला
- पंकज देवराम घोलप - येडगांव, पुणे
- मनोहर मामा भोसले - कुरुडवाडी, सोलापूर
- नाना बर्डे - आळे फाटा, पुणे
- ऋषिकेश वैद्य - वसई, मुंबई
- अल्ताफ रईस खान - मालाड, मुंबई
- रिधम पांचाळ मालाड, मुंबई
- गणेश शिंदे श्रीरामपूर, अहिल्यानगर
- अर्जुन चव्हाण (टनटन बाबा) - नवी मुंबई
- विठोबा वाल्मीक जाट - सातपूर, नाशिक
- किसन तळपे मंदोशी - खेड
- महेशगिरी (महेश काकडे) निफाड, नाशिक.






या कार्यक्रमास अतिरिक्त विभागीय आयुक्त कोकण विभाग श्री.सिध्दाराम सालीमठ, अपर आयुक्त (सामान्य) श्रीमती फरोग मुकादम, सह आयुक्त (नियोजन) प्रमोद केंभावी, सहआयुक्त (पुर्नवसन) श्री.रवि पाटील, सहआयुक्त (करमणूक व शुल्क) श्री.रविंद्र पवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, वरिष्ठ पोलीस अधिकारी, आदी विविध शासकीय अधिकारी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महाराष्ट्र दिनानिमित्त आयुक्त रुबल अग्रवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण

## उल्लेखनीय सेवेसाठी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव






**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्र दिनाच्या 67 व्या वर्धापन दिनानिमित्त, कोकण विभागाचे मुख्य ध्वजारोहण कोकण विभागीय महसूल आयुक्त रुबल अग्रवाल यांच्या हस्ते आज कळंबोली येथील नवी मुंबई पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांना महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या समारंभास नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र संजय दराडे आदी मान्यवर उपस्थित होते.

**प्रशस्त संचलनाने राष्ट्रध्वजाला मानवंदना**

समारंभात विविध पोलीस व आपत्कालीन सेवांच्या पथकांनी संचलनाद्वारे राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यामध्ये राज्य राखीव पोलीस दल क्र.11, जलद प्रतिसाद पथक, दंगल नियंत्रण पथक, नवी मुंबई पोलीस, महिला पोलीस, वाहतूक शाखा, अग्निशमन दल, पोलीस बँड पथक, श्वान पथक, बुलेट प्रुफ व बीडीडीएस वाहने, फायर रेस्क्यू बाईक, निर्भया पथक, आणि रस्ता सुरक्षा अभियान पथक आदींचा समावेश होता. प्रमुख अतिथींच्या उपस्थितीत हे संचलन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.

**उल्लेखनीय सेवेसाठी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव**

पोलीस विभागाच्या विविध शाखांमधील पुढील पोलीस अधिकारी व कर्मचारी : पोलीस उपअधिक्षक रमेश पंढरीनाथ भामे, पोलीस निरीक्षक सुनिल दत्तात्रय शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक महेश माने, पोलीस उपनिरीक्षक रमेश आनंदा पाटील, सहायक पोलीस निरीक्षक रविंद्र रघुनाथ राऊत, पोलीस हवालदार संजय बाळाराम तांडेल, पोलीस हवालदार सचिन साहेबराव शेवाळे, पोलीस हवालदार मच्छिंद्र उखा पवार, पोलीस हवालदार सचिन एकनाथ कडू , पोलीस नाईक अभय आत्माराम सांगळे तर सी सेवा पदक पोलीस उपनिरीक्षक तुकाराम सुरेश नागरे, पोलीस नाईक पृथ्वीराज अजितसिंग घोरपडे, या सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवाकालावधीत त्यांनी केलेल्या विशेष कार्याबद्दल आयुक्त रुबल अग्रवाल यांच्याहस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी भारत सरकार तर्फे होणाऱ्या जनगणना –2027 प्रथमच नागरिकांना स्वगणना म्हणजेचे स्वतःची माहिती स्वतः ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्याची सुविधा आजपासून करुन देण्यात आली आहे. ही स्वगणना दि.01 मे, 2026 ते दि.15 मे, 2026 या कालावधीत करावयाची आहे. या माहिमेचा शुभारंभ पनवेल महानगरपालिकेच्या वतीने विभागीय आयुक्त श्रीमती अग्रवाल यांच्याहस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी पाटील आणि निंबाजी गीते यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, सुसज्ज व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.












## मुंबईत १७४ इमारती अतिधोकादायक

### खासगी १४१, तर बीएमसीच्या २३ इमारती सी-वन श्रेणीत

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईत आजही ब्रिटीशकालीन इमारती असून इमारतींची सद्यस्थिती काय यासाठी मुंबई महापालिका दरवर्षी पावसाळ्यापूर्वी धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करते. यंदाच्या सर्वेक्षणातून १७४ अतिधोकादायक इमारती असल्याचे निदर्शनास आले आहे. यात एच पश्चिम विभागात २२ तर के पश्चिम विभागात १८ अतिधोकादायक इमारती असल्याची माहिती समोर आली आहे. १७४ पैकी ७२ इमारती रिकाम्या करण्यात आल्या असून ७१ इमारतींचा प्रश्न न्यायप्रविष्ट आहे. १७४ पैकी मुंबई महापालिकेच्या २३, खासगी १४१, तर सरकारी व म्हाडाच्या १० इमारती सी वन असल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. यापूर्वी जोरदार पावसात अशा अतिधोकादायक इमारती कोसळून दुर्घटना घडल्या आहेत. अनेक रहिवासी इमारती रिकाम्या करण्यास टाळाटाळ करतात. काहीजण न्यायालयात जाऊन स्थगिती मिळवण्यासाठी धाव घेत असल्याने अशा इमारती त्याच स्थितीत राहतात. या संदर्भात दीर्घकालीन योजना तयार करणार असल्याचे मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे यांनी सांगितले.

**२४९ ठिकाणी दरडीचा धोका!**

भांडुप, विक्रोळी, कुर्ला पूर्व, साकीनाका आदी ठिकाणी दरड कोसळण्याचा धोका अधिक असतो. मुंबईत एकूण २४९ ठिकाणी दरड कोसळण्याची ठिकाणं असून म्हाडाच्या माध्यमातून ९६ ठिकाणी संरक्षक भिंत बांधण्याची कार्यवाही सुरु आहे. तर यापूर्वी बांधण्यात आलेल्या संरक्षक भिंतीची आताची स्थिती काय, लोकांना स्थलांतरित करणे यासाठी नियमावली तयार करण्यात यावी, असे आदेश सहायक आयुक्तांना दिल्याचेही भिडे यांनी सांगितले.

**या विभागात सर्वाधिक सी वन इमारती**

डी वॉर्ड ८, जी नार्थ - ८, एच पश्चिम - २२, के पश्चिम - १८, के पूर्व - ११, कुर्ला - ८, घाटकोपर - ११, पी नार्थ - ११, पी साऊथ - ८, आर सेंट्रल - ९

सी वन इमारती सर्वाधिक कमी या विभागात

बी विभाग - १, सी विभाग - १, एम पश्चिम - १, ए वॉर्ड - ३, भांडुप - ४, मुलुंड - ४

**अशी केली जाते इमारतींची श्रेणी**

मुंबईतील जुन्या इमारतींचा सर्व्हे केला जातो. त्यात सी-१, सी -२ आणि सी-३ अशी कॅटेगरी केली जाते. सी-१ मध्ये आलेल्या इमारती अतिधोकादायक मानल्या जातात. सी-२ यादीत असलेल्या इमारतींच्या स्ट्रक्चरला दुरुस्तीची गरज असते, तर सी-३ इमारतींमध्ये किरकोळ दुरुस्ती आवश्यक असते. नियमानुसार रहिवाशांना नोटीस बजावून सात दिवसांच्या आत इमारत रिकामी करण्याचे आदेश प्रशासन देते.

## 1745 कोटींचा कोकीन साठा पकडला

### मुंबईत एनसीबीची मोठी कारवाई

**■जालना। प्रतिनिधी,**

देशाची आर्थिक राजधानी मुंबईत कोकीनचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोच्या टीमने मिळालेल्या टीपच्या आधारावर ही कारवाई केली. 349 किलोग्रॅम कोकीन जप्त केलं. एनसीबीने जप्त केलेल्या या कोकीनची बाजारातील अंदाजित किंमत 1775 कोटी आहे. नशेच्या पदाथार्चा इतका मोठा साठा कुठून आला? कोणी आणला? कुठे जाणार होता? हा तपासाचा विषय आहे. कोकीनचा एवढा मोठा साठा पकडल्याने ठउइ ची टीम सुद्धा चक्रावून गेली आहे. कोकीन जप्तीसह आंतरराष्ट्रीय ड्रग्स रॅकेटचा पदार्फाश केल्याचा दावा एनसीबीने केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या कारवाईसाठी एनसीबीला शुभेच्छा दिल्या आहेत.

एनसीबीच्या या यशाबद्दल अमित शाह यांनी एक्सवर पोस्ट केली आहे. नशा तस्करी विरोधात कठोर कारवाई सुरु ठेवण्याचा संकल्प बोलून दाखवलाय. त्यांनी एक्सवर लिहिलय की, एनसीबीने मुंबईत मोठी कारवाई केली. 349 किलो हायग्रेड कोकीन जप्त केलं. ज्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत 1745 कोटी रुपये आहे. हे ऑपरेशन म्हणजे एजन्सीच्या बॉटम टू टॉप अप्रोचच उदहाण आहे. सरकार ड्रग कार्टेलला मूळापासून संपवण्यासाठी कटिबद्ध असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अश्विनीने 2012 साली मुंबईत येऊन डान्स बारमध्ये काम सुरु केलं. वेळेबरोबर तिने पार्टीत ड्रग सप्लाय करायला सुरुवात केली. हळूहळू तिचं नेटवर्क मुंबईसह महाराष्ट्रातील अन्य शहरात पसरलं. खासकरुन कॉलेजला जाणारी मुलं तिच्या रडारवर असायची. एका गोळीसाठी ती 1500 ते 2000 रुपये घ्यायची. या प्रकरणात पोलिसांनी साकीनाका भागातून इरफान अन्सारी आणि सूफियान या दोन आरोपींना अटक केली होती. त्यांच्याकडे 200 गोळ्या सापडलेल्या. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारेच पोलीस अश्विनीपर्यंत पोहोचले.

**पद्मावती रॉयल्स सोसायटीमधून अटक**

याआधी मुंबई पोलिसांनी ड्रग तस्करी विरोधात मोठी कारवाई करताना एका पूर्व बार डान्सरला अटक केली होती. पोलिसांनी आरोपीकडून जवळपास 6 कोटी रुपयांच्या 5,000 एमडीएमए (एक्स्टेसी) गोळ्या जप्त केल्या होत्या. अश्विनी पॉल असं अटक केलेल्या महिलेचं नाव आहे. आरोपी महिला पुण्याची राहणारी आहे. मुंबई आणि महाराष्ट्रात पसरलेल्या एका मोठ्या ड्रग रॅकेटमधील ती एक महत्वाचा दुवा असू शकते. पोलिसांनी अश्विनीला टिटवाळ्याच्या पद्मावती रॉयल्स सोसायटीमधून अटक केली. छापेमारी दरम्यान पाच मोबाइल फोन आणि आठ सीम कार्ड पोलिसांनी जप्त केले आहेत. जोडीदार तुरुंगात गेल्यानंतर अश्विनीची या ड्रग व्यवसायात एन्ट्री झाल्याचं प्राथमिक तपासातून समोर आलय.

## टुरिस्ट व्हीजावर फिरायला आलेल्या 3 अमेरिकन नागरिकांना तडकाफडकी देश सोडण्याचे आदेश

### यांचा प्रताप पाहून पोलिसही संतापले

**■पुणे। प्रतिनिधी,**

पुणे शहर हे भारतातील सर्वात लोकप्रिय ठिकाण आहे. जगभरातून हजारोच्या संख्येने पर्यटक पुण्यात फिरण्यासाठी येतात. पुण्यात टुरिस्ट व्हीजावर फिरायला आलेल्या 3 अमेरिकन नागरिकांना तडकाफडकी देश सोडण्याचे आदेश देण्यात आले. या प्रताप पाहून पोलिसही संतापले आहेत. स्थानिकांच्या सतर्कतेमुळे या पर्यटकांची पोल खोल झाली.

टुरिस्ट व्हीजावर भारतात आलेल्या तीन अमेरिकन नागरिकांकडून ख्रिश्चन धमार्चा प्रचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पोलिसांनी या 3 अमेरिकन नागरिकांना 10 मेपूर्वी देश सोडण्याचे आदेश दिले आहेत. संबंधित तिघे काही दिवसांपूर्वी भारतात येऊन पिंपरी-चिंचवडमधील एका हॉटेलमध्ये 26 एप्रिल रोजी मुक्कामाला होते. त्यानंतर 27 एप्रिलला ते पुण्यातील शुक्रवार पेठ परिसरात गेले.

यावेळी त्यांच्या जवळ मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत छापलेली धार्मिक पत्रके आढळली. त्यांनी एका वाहनचालकाला पत्रक देत ख्रिश्चन धर्म इतर धर्मापेक्षा श्रेष्ठ असल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला. संशय आल्याने संबंधित चालकाने पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी तत्काळ तिघांना ताब्यात घेऊन विशेष शाखेत चौकशी केली.

चौकशीत त्यांनी धर्मप्रसाराचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले. टुरिस्ट व्हीजावर अशा प्रकारच्या कृतींना कायद्याने मनाई असल्याने ही कारवाई करण्यात आली. तसेच, हे तिघे यापूवीर्ही विविध व्हीजावर भारतात येत असल्याचे त्यांच्या पासपोर्ट तपासणीतून स्पष्ट झाले आहे.

**नाशिक धर्मांतर प्रकरणाचे मलेशिया कनेक्शन**

नाशिक क्ळ कंपनी प्रकरणातील पीडित महिलेला धर्मांतर करून मलेशियाला पाठवणार असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मालेगाव टू मलेशिया असं या प्रकरणाचं कनेक्शन आहे. नाशिकमधील बहुराष्ट्रीय कंपनीतल्या धर्मांतर प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आलीय. नाशिकमधील बहुराष्ट्रीय कंपनीतल्या पीडित तरुणीचं धर्मांतर करुन तिला मलेशियात पाठवण्याची तयारी सुरु असल्याची माहिती समोर आलीये. यासाठी मालेगावीतील काही संशयित नाशिकमधील आरोपींच्या संपर्कात अससल्याची माहिती आहे. एवढंच नाही तर पीडित तरुणीचं हनिया असं नावही ठेवण्यात आलं होतं. मलेशियात इम्रान नावाच्या व्यक्तीकडं तिला पाठवण्याची तयारी सुरु असल्याचंही सरकारी वकिलांनी कोर्टात सांगितलंय. या सगळ्या प्रकरणात निदा खान हिनं महत्वाची भूमिका बजावल्याचा दावा सरकारी वकिलांनी केलाय.

## जालनाही ड्रग्सच्या जाळ्यात, नशेच्या गोळ्यांची सर्रास विक्री सुरु!




**■जालना। प्रतिनिधी,**

जालना शहरामध्ये बंदी असलेल्या नशेच्या गोळ्यांची विक्री सुरू असल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं आहे. आता या संदर्भात अशी माहिती समोर आली आहे की, शहरातील कदीम जालना पोलिसांना शहरात नशेच्या मात्र बंदी असलेल्या गोळ्यांची विक्री सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. या माहितीवरून पोलिसांनी अन्न आणि औषधी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना बोलावून घेत सापळा रचला. शहरातील रेल्वे उड्डाणपुलाच्या खाली हा सापळा रचण्यात आला. या सापळ्यात सय्यद सलमान सय्यद गफूर नावाच्या तरुणाची झाडाझडती घेण्यात आली. यावेळी त्याच्याजवळ अल्प्रा झोलम नावाच्या 325 गोळ्या आढळून आल्या. या गोळ्या पोलिसांनी जप्त करत सय्यद सलमान सय्यद गफूर याला ताब्यात घेतलंय.

विशेष म्हणजे अल्प्रा झोलम या गोळ्या विक्री करण्यासाठी बंदी आहे. तरीही या गोळ्यांची सर्रासपणे विक्री सुरु आहे. या गोळ्यांमुळे नशा येऊन लवकर झोप लागते तसंच सुस्ती येते. या नशेच्या गोळ्या शरिरावर विघातक परिणाम करणाऱ्या असल्यानं या गोळ्या विक्रीसाठी बंदी घालण्यात आलीये. दरम्यान पोलिसांनी ताब्यात घेतलेला तरुण ज्या व्यक्तीकडून या गोळ्या घेत होता तो फरार झालाय. सध्या पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत. या गोळ्या विक्री करण्यामागे मोठं रॅकेट असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली असून पोलीस या अनुषंगानं तपास करत आहेत.

अल्प्रा झोलम या बंदी असलेल्या गोळ्यांची शहरात विक्री सुरू असल्यानं एकच खळबळ उडालीय. सध्या पोलिसांनी या प्रकरणातील फरार असलेल्या आरोपीला पकडण्यासाठी कंबर कसली असून हा आरोपी पकडल्यानंतरच शहरातील वेगवेगळ्या भागात होणाऱ्या नशेच्या गोळ्यांच्या विक्रीची माहिती समोर येणार आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार असे सांगण्यात आले आहे की जुन्या जालनामध्ये नुतन वसाहतीमध्ये एक व्यक्ती बेकायदेशीरपणे नशेसाठी बटन गोळ्यांची विक्री करत होते.




संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मराठी बोलायची कोणी?




**अभिजात भाषेचा मान मिळवूनही आज मराठी आपल्याच घरात पोरकी होतेय की काय, अशी भीती वाटू लागली आहे. रिक्षा-टॅक्सीचालकांनी मराठी बोललं पाहिजे ही मागणी कायदेशीररीत्या योग्यच आहे, पण जेव्हा दोन मराठी माणसं एकमेकांशी हिंदीत संवाद सुरू करतात, तेव्हा त्या मागणीतील धार कमी होते.**

राज्यातील रिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी एक मेपासून केलेला मराठी सक्तीचा निर्णय सध्या मत-मतांतरांनी गाजतो आहे. या निर्णयाला कायदेशीर आधार असल्याने त्याला थेट विरोध करणं कोणालाही अडचणीचंच आहे. त्यामुळे, वेगवेगळी खुस्पटं काढून त्यात खोडा घालण्याचा प्रयत्न सुरू आहे. राजकीय पक्षांमध्ये या निर्णयाला विरोध शिवसेनेतूनच झाला आहे. शिवसेनेतील अमराठी, उत्तर भारतीय नेते संजय निरुपम यांना प्रकाशझोतात येण्यासाठी हे चांगलं निमित्त मिळालं. यात दोन गंमती आहेत. मूळ निर्णय परिवहन विभागाचा आहे. त्याचे मंत्री प्रताप सरनाईक हे शिवसेनेचे नेते आहेत. त्यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी उभे राहिलेले पहिले नेते निरुपमही त्याच पक्षाचे आहेत! निरुपम मूळ पत्रकार. ते मुंबईत राजकीय क्षितिजावर उगवले ते पूर्वीच्या, म्हणजे मूळ शिवसेनेतून. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असतानाच. दोन वेळा खासदारकी झाल्यानंतर ते काँग्रेसवासी झाले. तिथून पुन्हा विभाजित शिवसेनेच्या, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील झाले. सरनाईक यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी त्यांनी काल दहिसर गाठलं. तिथे त्यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सैनिकांशी गाठ पडली. त्यातून जो गोंधळ व्हायचा, तो झाला. रिक्षा-टॅक्सीचालकांसाठी मराठीसक्तीचा मुद्दा त्यामुळे वादाचा झाला. मनसेने आता साहजिकच त्यात पुढाकार घेतला आहे. 'महाराष्ट्रात मराठीचं भवितव्य' हा चिंतेचा विषय आजचा नाही. दशकानुदशके या विषयावर चर्वितचरण सुरू आहे. मराठीची पीछेहाटही अव्याहत सुरू आहे!! दरम्यानच्या काळात मोठा जोर लाऊन, राजकीय परिस्थितीचा फायदा उठवून महाराष्ट्राने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवला. हा दर्जा देणं केंद्राचं काम होतं. महाराष्ट्राच्या सरकारने ते केंद्राला करायला लावलं. पण, हा दर्जा मिळाल्यानंतर मराठीसाठी काही भरीव करायला हवं होतं ना? दोन-चार संशोधन प्रकल्प तरी सुरू व्हायला हवे होते. निदान मुंबईतल्या 'मराठी भाषा भावना'चं काय? हा प्रश्न विचारायला हवा होता. ते कोणी केलं का? आपली भाषा दुसऱ्याच्या माथी मारून त्यातून मातृभाषेचा विकास होईल, हा समज खरोखरच अजब आहे! भाषावार प्रांतरचनेच्या मूळ उद्देशाला धरून प्रत्येक प्रांतात तिथल्या राज्य भाषेचा वापर आणि विकास झाला पाहिजे, यात कोणाचंच दुमत नाही. कोणी याला विरोध करत असेल, तर त्याला तिथल्या तिथे या देशाच्या रचनेची जाणीव करून दिली पाहिजे. पण, आपली राज्यभाषा, आपली मातृभाषा जपण्याची, तिची प्रतिष्ठा वाढवण्याची, तिच्यात वेळोवेळी भर घालण्याची जबाबदारी त्या त्या भाषिक समूहांची असते. महाराष्ट्रात ही जबाबदारी मराठी भाषकांची आहे. त्यांनी व्यवहारात मराठी वापरली, तरच अन्य भाषकही आपसूक मराठी वापरतील. मराठी वापराची ही सुरुवात मराठी माणसानेच करायला हवी. ती त्याची जबाबदारी आहे. परप्रांतीय, अमराठी भाषकांची नाही. मुंबई ही साऱ्या देशाचं पोट भरणारी नगरी असल्याने इथे संपूर्ण देशातून लोक येत राहतात. वर्षानुवर्षं हे सुरू आहे. त्यामुळे, अन्य प्रांतातून मुंबईत येऊन स्थायिक झालेल्यांच्याही आता तीन - चार पिढ्या इथे नांदल्या आहेत. कायदेशीर भाषेत तेही 'महाराष्ट्रीय'च आहेत. तरीही अशा कुटुंबातल्या अनेकांना व्यवहारापुरतीही नीट मराठी येत नाही, हा दोष कुणाचा? त्यात त्यांचा वाटा तर आहेच; पण त्याहीपेक्षा अधिक त्यांना मराठी बोलणं, मराठी भाषेतून व्यवहार करणं अपरिहार्य न करणाऱ्या इथल्या स्थानिकांचा; म्हणजे मराठी माणसांचा आहे. बॉलिवूडचं केंद्र मुंबई असल्याने म्हणा, देशाची आर्थिक राजधानी ठरल्याने म्हणा, मराठी आणि हिंदीची लिपी एक असल्याने म्हणा, मराठी माणसाच्या न्यूनगंड म्हणा, की अतिभिडस्त स्वभाव म्हणा; पण मराठी माणूस मुंबईत सार्वजनिक ठिकाणी आपोआप हिंदी भाषेत शिरतो, हे ढळढळीत सत्य आहे. लोकल ट्रेनमध्ये सर्व अन्य भाषक आपल्या स्नेह्यांशी फोनवर किंवा अगदी आपसातही तारस्वरात मातृभाषेत बोलतात. सर्रास दिसणाऱ्या या दृश्यात मराठी माणूस तसा बोलताना कधी दिसतो का? दोन अनोळखी मराठी माणसंही आपला संवाद बहुतेकदा हिंदी किंवा इंग्रजीतूनच सुरू करतात. हा दोष कुणाचा? सेमी इंग्लिशचा पुरस्कार करूनही मराठी पालक आपल्या मुलांना शुद्ध इंग्रजी शाळेत घालण्यासाठी जीवाचा आटापिटा करतात. का? कारण, त्यांच्या नेत्यांची, साहित्यिकांची, अभिजात वर्गातली मुलं त्याच शाळेत शिकतात. मराठीतली नवी पिढी मराठीपासून अशी तुटली आहे, हे खरं ना? सामान्य मराठी माणसाने मराठी सण-उत्सव जिवंत ठेवण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आहे. आता मराठी भाषा जगवण्याची जबाबदारीही त्यानेच घ्यायला हवी का? ते होत नाही, म्हणून भाषा जगवण्यासाठी तिचा असा विस्तार करायचा आहे का? मुळात वाहनचालक ज्या राज्यात परवाना घेत असेल, त्या राज्याची भाषा किमान स्वरूपात त्याला यायलाच हवी, असा नियम आहे. महाराष्ट्रात २०११ मध्येच त्याचा अंतर्भाव झाला आहे. त्याची कडक, अनिवार्य अंमलबजावणी व्हावी यासाठी सरकारने आता भूमिका घेतली आहे आणि ती योग्यच आहे. मध्य मुंबईतले अमराठी दुकानदार चांगली मराठी बोलतात. कारण, ती त्यांची व्यावसायिक गरज आहे. सर्व मराठीबहुल भागात हा अनुभव येईल. मुंबईने मराठी बोलावं असं वाटत असेल, तर मुंबईच्या वातावरणात मराठी पाहिजे. कानावर सतत मराठी पडली पाहिजे. परप्रांतीय टॅक्सी आणि रिक्षाचालक इथे निव्वळ पोट भरायला आले आहेत. मराठीचा दुःस्वास करायला नाही. पोट भरण्यासाठी, व्यवसायासाठी जे आवश्यक, ते ते करतीलच. मराठीही बोलतील. अट एकच आहे, मराठी माणसाने त्याच्याशी मराठीत बोललं पाहिजे. दुसऱ्यावर सक्ती करण्यापूर्वी आपण आपल्यावरच ही सक्ती करायला हवी. तसं केलं तर, ना शासन निर्णयाची गरज भासेल, ना कुठल्या अटी - शर्तींची, ना आंदोलनाची!

# मराठी सक्तीमागे भाषा प्रेम की राजकारण?

**मराठी भाषेचे रक्षण हे सक्तीच्या भीतीतून नव्हे, तर आपुलकीच्या भावनेतून व्हायला हवे; रिक्षा-टॅक्सीचालकांसाठी अचानक लागू केलेली ही सक्ती भाषिक अस्मितेपेक्षा राजकीय गणितांचाच भाग अधिक वाटते.**

मराठी भाषेचे संरक्षण व्हायलाच हवे, पण ते संरक्षण परवाना रद्द करण्याच्या भीतीतून नाही, तर भाषेच्या प्रेमातून व्हायला हवे. भाषा शस्त्र नसते, ती सेतू असते माणसांना जोडणारा. आज महाराष्ट्र सरकारने मराठीला सेतू म्हणून नाही, तर तलवार म्हणून वापरले आहे. ही चूक वेळीच सुधारली नाही, तर मराठी माणूस आणि परप्रांतीय कामगार यांच्यातील दरी आणखी रुंदावेल आणि त्याचा फायदा राजकारण्यांनाच होईल, महाराष्ट्राला नाही.

येत्या १ मे, महाराष्ट्र दिनापासून राज्यातील सर्व परवानाधारक रिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी मराठी भाषेचे ज्ञान असणे अनिवार्य करण्यात आले आहे. परिवहन विभागातर्फे ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांच्या माध्यमातून विशेष तपासणी मोहीम राबवली जाणार असून, ज्या चालकांना मराठी लिहिता, वाचता किंवा बोलता येणार नाही, त्यांचे परवाने रद्द करण्यात येतील, असा कडक इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. जर हा पथदर्शी प्रकल्प यशस्वी ठरला, तर तो संपूर्ण महाराष्ट्रभर लागू करण्याचा सरकारचा मानस आहे. हा निर्णय अचानक आलेला नाही. भाजप आमदार नरेंद्र मेहता यांनी केलेल्या तक्रारीनंतर ही कारवाई सुरू करण्यात आली आहे. मेहता यांनी आरोप केला होता की, मोठ्या संख्येने नवीन स्थलांतरितांना घाईघाईने परवाने आणि परवानगी पत्रे दिली जात आहेत. या तक्रारीला राजकीय रंग आहे, हे नाकारता येत नाही. मात्र त्याचवेळी मराठी माणसाच्या न्याय्य मागण्यांशीही हे निगडित आहे. त्यामुळेच या निर्णयाचे सरसकट समर्थन किंवा सरसकट विरोध दोन्ही चुकीचे ठरेल.

### मुंबईत पाच लाख लोकांना रोजगार देणारी रिक्षा-टॅक्सी

मुंबई आणि उपनगरांमध्ये अंदाजे २.८ लाख ऑटो परवानाधारक आणि २० हजार टॅक्सी परवानाधारक आहेत. हे परवानाधारक अंदाजे ५ लाख चालकांना रोजगार देतात. परिणामी, या कारवाईचा लाखो लोकांवर परिणाम होऊ शकतो. यात फक्त मुंबईची आकडेवारी आहे. राज्यात सुमारे १५ लाख रिक्षा असून, त्यावर कोट्यवधी नागरिकांचा अप्रत्यक्ष उदरनिर्वाह अवलंबून आहे. मुंबईमध्ये ७० टक्के ऑटो-टॅक्सीचालक गैर-मराठीभाषी आहेत. हे चालक प्रामुख्याने उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान आणि अन्य राज्यांतून आलेले आहेत. त्यापैकी अनेकांनी दशकांपूर्वी मुंबईत येऊन स्वतःला या शहराशी जोडून घेतले आहे. त्यांची मुले इथेच जन्मली, इथेच शिकली. तरीही भाषेची अडचण कायम राहिली हे एक वास्तव आहे आणि हे दुर्दैव आहे.

### नियम जुनाच, मात्र अंमलबजावणी नव्याने

मोटार परिवहन विभागामार्फत रिक्षा किंवा टॅक्सीचालकांना परवाना देताना स्थानिक भाषेचे, म्हणजेच मराठी भाषेचे ज्ञान असणे हा नियम आधीपासूनच लागू आहे. मात्र, मुंबई महानगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये अनेक परवानाधारक चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधता येत नाही, तसेच काही चालक मराठी बोलण्यास टाळाटाळ करतात, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत. महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ नुसार, चालकांना स्थानिक भाषा, मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. म्हणजे हा नियम तब्बल ३७ वर्षे कागदावर होता, पण अंमलबजावणी शून्य होती. आता अचानक त्याची जोरदार अंमलबजावणी सुरू करणे म्हणजे वर्षानुवर्षे दुर्लक्ष करून आता अचानक झटका देण्यासारखे आहे. परवाने देताना त्यांची पोलीस पडताळणी केली जाते व त्यानंतर ऑटोरिक्षा-टॅक्सीचालकांना परवाने दिले जातात. शहरांमध्ये ऑटोरिक्षा परवानासाठी १५ हजार, तर ग्रामीण भागात ५ हजार शुल्क भरावे लागते. हे शुल्क भरताना मराठीची चाचणी घेणे परिवहन विभागाची जबाबदारी नव्हती का? महाराष्ट्रात १५ वर्षे वास्तव्यास असलेल्यांनाच ऑटोरिक्षा-टॅक्सीचे परवाने दिले जातात. म्हणजे ज्यांनी १५ वर्षे राहूनही परवाना मिळवला आणि विशेष म्हणजे त्यांना मराठी भाषा येत नसतानाही तो दिला गेला! त्यांना आता भाषा येत नाही म्हणून रस्त्यावर आणायचे? हे परस्परविरोधी धोरण आहे.

### इतर राज्यातही स्थानिक मातृभाषा अनिवार्य

मराठी सक्ती ही काही नवीन कल्पना नाही. देशभरात अशा प्रकारचे नियम अस्तित्वात आहेत. तमिळनाडूमध्ये ऑटोचालकांना तमिळ येणे अनिवार्य आहे. कर्नाटकमध्ये कन्नड भाषेचा आग्रह धरला जातो. आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्येही स्थानिक भाषेची सक्ती सार्वजनिक वाहतुकीत आहे. मात्र या राज्यांनी त्याची अंमलबजावणी एकाएकी न करता टप्प्याटप्प्याने केली. त्यासाठी प्रशिक्षण केंद्रे उभारली, वेळ दिला, संक्रमण कालावधी निश्चित केला. महाराष्ट्राने मात्र घोषणा आणि अंमलबजावणी यांच्यात जेमतेम काही आठवड्यांचे अंतर ठेवले हा खरा प्रश्न आहे. या सक्तीमुळे अनेक चालक बेरोजगार होऊ शकतात, कर्ज काढून रिक्षा/टॅक्सी घेतलेल्या चालकांवर आर्थिक ताण वाढेल, अचानक नियम बदलल्याने सामाजिक असंतोष निर्माण होण्याची शक्यता आहे, राज्यात ॲप आधारित कॅब सेवा आणि बाइक टॅक्सी मोठ्या प्रमाणावर सुरू असून, त्यांच्यावर कठोर नियमांची अंमलबजावणी होत नाही. मात्र पारंपरिक रिक्षा-टॅक्सीचालकांवरच भाषेच्या नावाखाली बंधने लादली जात आहेत. हा दुजाभाव स्पष्टपणे दिसतो आणि तोच युनियन्सच्या रागाचा मुख्य मुद्दा आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे ज्यात राजकारणाचा वास येत आहे.

### भाषाप्रेम की मतांची गणिते?

भाजपच्या स्वतःच्या काही गटांनी चिंता व्यक्त केली आहे की या निर्णयामुळे उत्तर भारतीय मतदार नाराज होऊ शकतात. हे वाक्य या निर्णयाचा खरा चेहरा उघड करते. मराठी अस्मिता जपण्याचा प्रश्न आणि उत्तर भारतीय मतांची काळजी या दोन्ही गोष्टी एकाच निर्णयात गुंफलेल्या आहेत. महायुतीचे सरकार शिंदे गट, भाजप आणि राष्ट्रवादी अजित गट यांचे आहे. शिवसेना नेहमीच मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर आक्रमक राहिली आहे. पण तेव्हाचे विषय वेगळे होते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे शिंदे गटाचे आहेत. त्यामुळे हा निर्णय मराठी मतपेढी बळकट करण्याच्या उद्देशाने घेण्यात आला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. यात त्यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या मनसे पक्षात झालेल्या युतीमुळे मराठी मतांची झालेली एकजूट आपल्याकडे खेचण्याचा केविलवाणा प्रयत्न असल्याचे दिसून येते. मात्र त्याचवेळी, मराठी माणसाची व्यथाही खरी आहे. स्वतःच्याच राज्यात, स्वतःच्याच शहरात रिक्षात बसल्यावर स्थानिक भाषेत संवाद साधता न येणे हे खरोखरच निराशाजनक आहे. प्रवाशाला ठिकाण समजावून सांगताना अडचण येणे, भाडेवाढीबद्दल वाद होणे हे प्रश्न वास्तवातले आहेत. यावर उपाय आहेत आपण मराठीत बोलले तर समोरच्याला ते कळते. त्यामुळे तेवढ्यापुरते पुरेसे आहे त्याच्याकडूनही सक्तीने मराठीच वदवून घेणे आजच्या काळात वादाला आमंत्रण देण्यासारखे होऊ शकते.




### खरा उपाय सक्तीत नाही, सहकार्यात आहे

खरंतर सरकारने हे आधीच करायला हवे होते. परवाना नूतनीकरणाच्या वेळी मराठी चाचणी घेणे, पण त्यापूर्वी किमान सहा महिने प्रशिक्षण देणे. नव्या परवानाधारकांसाठी ताबडतोब हा नियम लागू करणे. जुन्या चालकांना संक्रमण कालावधी देणे. ओला-उबेर-बाइक टॅक्सींवरही हाच नियम लागू करणे. विशेष मराठी शिकवणी केंद्रे मोफत सुरू करणे. या गोष्टी इतक्या वर्षांत सरकारने केल्याच नाहीत. मग आता अचानक सक्ती करून परवाना रद्द करण्यापर्यंत पाऊल उचलणे कितपत योग्य आहे? मराठी भाषा जगवणे ही प्रत्येक महाराष्ट्रीयाची भावनिक गरज आहे, हे निर्विवाद. पण ती भाषा जगवायची असेल तर ती लादण्यापेक्षा आवडायला लावणे अधिक परिणामकारक ठरते. खरा उपाय सक्तीत नाही सहकार्यात आहे. सुज्ञास अधिक सांगणे न लगे.

# मराठी पाऊल पडते मागे!

महाराष्ट्राचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी काही दिवसांपूर्वी मोठी गर्जना केली होती. 1 मेपासून सर्व रिक्षा आणि टॅक्सीचालकांना प्रवाशांशी मराठीत बोलणे अनिवार्य असेल. त्यावरून बरंच अकांडतांडव झालं. स्वतःला खरी शिवसेना म्हणवणाऱ्या पक्षाच्या मंत्र्यांनी पुढाकार घेतल्यामुळे मराठी भाषेसाठी एक पाऊल पुढे पडेल, असे वाटत असताना या मराठी मंत्री महोदयांना एक पाऊल मागे घ्यावे लागले आहे. मुळात प्रताप सरनाईक हे शिवसेनेचे नेते आहेत. आणि त्यांच्या पक्षातील संजय निरुपम यांनी सरनाईकांच्या म्हणजेच सरकारच्या निर्णयाला विरोध केला होता, हे लक्षात घ्यायला हवे. अखेर दोन दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत सरकारने मराठी बोलण्यासाठी रिक्षा-टॅक्सीचालकांना 15 ऑगस्टपर्यंत मुदत देत एक पाऊल मागे घेतले आहे. वरवर पाहिले तर फार संघर्ष न होता निर्णय झाल्यामुळे रिक्षा-टॅक्सीचालकांचा संप टळला आहे. महाराष्ट्र दिनापासून मराठी भाषा बोलणे परिवहनमंत्री सरनाईक यांनी सक्तीचे केल्यामुळे 4 मेपासून राज्यातील रिक्षाचालक आणि टॅक्सीचालकांनी निदर्शने करण्याचा निर्णय घेतला होता. किंबहुना तसा इशारा ऑटोरिक्षा चालक-मालक संघटना संयुक्त कृती समिती महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष शशांक राव यांनी दिला होता. हा निर्णय किती राजकीय आणि किती अराजकीय हा मुद्दा बाजूला ठेवला तरी ज्या राज्यात आपण पोट भरतो, ज्या मातीत जगतो तेथील भाषा शिकण्यास विरोध का, असा प्रश्न कुणाच्याही मनात येतो.

प्रताप सरनाईक यांच्यासारखा शिवसेनेचा नेता आणि मंत्री जर मराठी सक्तीचा निर्णय घेत असेल तर त्याचे स्वागत व्हायला हवे होते. मात्र, तिथंच संजय निरुपम, गुणरत्न सदावर्ते यांच्या रुपातील माशा शिंकल्या. वास्तविक संजय निरुपम हे शिवसेनेचेच म्हणजे एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचेच नेते आहेत. आणि त्यांनी त्यांच्याच नेत्याने घेतलेल्या निर्णयाला डिप्लोमॅटिक पद्धतीने विरोध केला. म्हणजे निरुपम यांनी त्यांच्या बिहारी बांधवांची बाजू घेतली, जे दशक-दोन दशके महाराष्ट्रात आणि राज्याच्या राजधानीत मुंबईत रिक्षा-टॅक्सी चालवत आहेत. बरं शशांक राव आणि निरुपम यांच्या इशाऱ्यानंतर परिवहन मंत्र्यांनी त्यांच्याशी चर्चा करून त्यांनी मराठी शिकण्यासाठी या चालकांना साडेतीन महिन्यांची मुदत दिली. संघर्ष आणि कटूपणा टळला तरीही प्रश्न उभा राहतो सरकारने त्यांना मुदत का दिली? जे कित्येक वर्षे मुंबईत राहूनही मराठी बोलत नाहीत, मराठीविरोधात संघर्षाची हाक देतात त्यांना सरकारने संधी देऊन काय साधले? तसेच साडेतीन महिन्यांनंतरही ही मंडळी मराठी शिकले नाहीत, तर सरकार नक्की कोणती भूमिका घेणार? त्यानंतरही मुख्य प्रश्न असा आहे की राज्यात केवळ अमराठी रिक्षाचालक आणि टॅक्सीचालक आहेत, असा सरकारचा समज आहे का? इतर वेळा उपोषण, आंदोलनांची अजिबात दखल न घेणाऱ्या सरकारला तातडीने रिक्षा-टॅक्सीचालकांच्या संघटनेशी चर्चा करून त्यांना मराठी बोलण्यासाठी मुदतवाढ का द्यावीशी वाटली, हे स्पष्ट व्हायला हवे. तसेच रिक्षा-टॅक्सीचालकांची संघटना संजय निरुपम यांनी केव्हापासून सुरू केली, असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. सरकारने निरुपम यांना जसे चर्चेसाठी बोलावले तसे मराठीच्या भूमिकेसाठी आक्रमक असलेले मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनाही चर्चेसाठी बोलवायला हवे होते. मात्र, तसे झालेले नाही.

रिक्षा-टॅक्सीचालकांचे राज्यव्यापी आंदोलन झाले असते तर मराठी भाषेला विरोध करणाऱ्या परप्रांतीय रिक्षाचालकांची आकडेवारी समोर आली असती. नेमके यावरच पांघरूण घालण्यात आले आहे. जो 15 लाखांचा आकडा सांगण्यात येत होता, त्यातील वास्तव समोर आले असते. मात्र, एकाच पक्षाचे दोन नेते वेगवेगळ्या भूमिका घेत असताना निरुपम यांना झुकते माप देत सरनाईक यांना एक पाऊल मागे घ्यायला का सांगण्यात आले हे अनाकलनीय आहे. कदाचित भविष्यात हिंदी भाषिकांच्या मतांची त्यांच्या पक्षाला भुरळ पडली असावी. महाराष्ट्रात राहून मराठी बोलणार नाही अशी भूमिका घेत त्याविरोधात आंदोलनाची हाक देणाऱ्यांसमोर सरकारने एक पाऊल मागे घेतल्याने मराठीजनांच्या मनात सरकारची प्रतिमा कशी डागाळली असेल, याचाही विचार करायला हवा. तरीही प्रताप सरनाईक यांनी मुजोरी चालणार नाही, असा सज्जड दम देत बाजू सांभाळली आहे.

महाराष्ट्रात आहात त्यामुळे मराठीविरोधाची भूमिका चालणार नाही, असे कडक बोल सुनावले आहेत. त्याचवेळी अमराठी चालकांना एक संधी देत सरकारने पडती बाजू घेतली आहे. आता खरी जबाबदारी आरटीओ विभागाची आहे. कारण 1 मे ते 15 ऑगस्ट हे 107 दिवस आरटीओला विशेष पडताळणी मोहीम राबवायची आहे. या कालावधीत बेकायदा वाहतूक करणारे चालक, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांचा परवाना रद्द केला जाणार आहे. आरटीओने ही जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली तर कुठल्याही परवान्याशिवाय रिक्षा-टॅक्सी चालवणाऱ्यांना नक्कीच झटका बसेल. शिवाय सर्व काही नियमानुसार केले हे सांगायलाही सरकार मोकळे होईल. मात्र, प्रत्येकवेळी मराठीच्या मुद्द्यावर अमराठींसमोर सरकारने अजिबात झुकण्याची गरज नाही किंवा सरकारमधील लोकांनी विरोधी भूमिका घेत उगाचच कायद्याकडे बोट दाखवण्याची गरज नाही. कारण राज्यांची प्रांतरचना भाषेनुसार झालेली आहे. आता मराठी माणसांचीही जबाबदारी वाढली आहे. मराठीजनांनीही संवादाची सुरुवात मराठीत करायला हवी आणि त्यात अहंकार किंवा दादागिरी नसावी, कारण प्रेमाने जग जिंकता येते, असे संत सांगून गेले आहेत.

# देशात 'अभिजात' महाराष्ट्रात 'दप्तरात'!




महाराष्ट्रामध्ये १ मेपासून, म्हणजे महाराष्ट्रदिनापासून टॅक्सी, रिक्शा, ओला, उबेर यांच्या चालकांसाठी मराठी भाषा लिहिता-बोलता येणे अनिवार्य करण्यात येणार आहे. यासाठी 'महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९'मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. त्यामुळे भविष्यात चालकांना वाहन परवाना देतांना किंवा नूतनीकरण करतांना चालकाच्या मराठी भाषेचे ज्ञानही पडताळले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या या निर्णयामुळे राज्यात संमिश्र पडसाद उमटत आहेत. काही वृत्तवाहिनींच्या प्रतिनिधींनी काही टॅक्सी, रिक्शा, ओला, उबेर यांच्या चालकांच्या प्रतिक्रियाही घेतल्या. यामध्येही काहींनी निर्णयाचे स्वागत केले, तर काहींनी नापसंती व्यक्त केली. २४ एप्रिल या दिवशी या निर्णयावरून मनसेचे कार्यकर्ते आणि हिंदी भाषिक यांच्यात वादावादीही झाली. थोडक्यात मराठी भाषा अनिवार्य करण्याचा विषय वादाकडे वळत आहे. मातृभाषेवरून वाद होणे, हे ना महाराष्ट्रासाठी चांगले आहे, ना देशाच्या एकतेसाठी चांगले आहे.

### मराठी माणसानेही आत्मचिंतन करावे!

महाराष्ट्रात रिक्शा, टॅक्सी, ओला, उबेर यांच्या चालकांमध्ये अन्य भाषिकांची संख्या मोठी आहे. यांतील बहुतांश चालक अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात रहातात. त्यांची ओळखही 'मुंबईकर' अशी झाली आहे; परंतु अनेक चालक मराठीतून बोलणे टाळतात. अनेकदा प्रवासी मराठीत बोलत असूनही अन्य भाषिक चालक मराठी बोलण्याचे सौजन्यही दाखवत नाहीत. यामध्ये काही जणांना मराठी भाषा खरोखरच येत नसेल, असे असू शकते. काही जण मात्र जाणीवपूर्वक मराठी बोलण्याचे टाळतात. त्यामुळे याची परिणती वादात होते. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यामुळे चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्यात आल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले. अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात राहूनही येथील मातृभाषा शिकून न घेणे, हे चुकीचेच आहे. जेथे आपल्या उदरभरणाची व्यवस्था होते, त्या ठिकाणची मातृभाषा शिकणे, हे रोजीरोटीसाठी आवश्यक ठरते; परंतु त्यापेक्षाही तेथील अस्मितेचा आदर करणे, हे खरे राष्ट्रीयत्वाचे लक्षण आहे. प्रत्येकाने अन्य राज्यांच्या भाषेचा आदर करणे, हे यातूनच घडू शकते; परंतु प्रत्यक्षात मात्र तसे होत नाही, हे दुर्दैवाचे आहे. स्वभाषेची अस्मिता न बाळगणे आणि अन्यांच्या भाषांचा आदर न करणे यांतूनच भाषिक वाद निर्माण होत आहेत. ज्या राज्यात रहातो, तेथील मातृभाषेचा आदर कुणी राखत नसेल, तर अशांना त्यांची जागा दाखवणेही आवश्यकच आहे; परंतु अशी वेळ का येते, याचाही विचार व्हायला हवा. अनेक वर्षे महाराष्ट्रात रोजीरोटीसाठी रहाणारे मराठी शिकले नाहीत, यात मराठी भाषिकांचेही अपयश आहे. याचेही आत्मचिंतन मराठी माणसाने करणे आवश्यक आहे, अन्यथा भविष्यात मराठीची स्थिती आणखी दयनीय होईल.

### प्रथम स्वतः अंगीकार करा!

मराठी भाषेला अभिजात (समृद्ध) भाषेचा दर्जा मिळणे आणि तिची अस्मिता टिकवणे, हे दोन्ही विषय भिन्न आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे महाराष्ट्रात तिची अस्मिता जपली गेली, असे झालेले नाही. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर केंद्रशासनाकडून मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी निधी उपलब्ध होईल, अन्य राज्यांतील विद्यापिठांमध्ये मराठी भाषेतून अभ्यासक्रम शिकवले जातील आणि महाराष्ट्र अन् महाराष्ट्राच्या बाहेर मराठी भाषेचे विविध कार्यक्रम सादर होतील, उपक्रम राबवले जातील; परंतु मुळात महाराष्ट्रात रहाणारा मराठी माणूस जोपर्यंत स्वतः मराठी भाषेविषयी अस्मिता बाळगणार नाही, तोपर्यंत 'देशात अभिजात आणि महाराष्ट्रात दप्तरात', अशी मराठीची स्थिती आहे. जेव्हा मराठी माणूस स्वतःच्या मातृभाषेचा आदर करील, तेव्हाच अन्यही करतील. हे कटू असले, तरी वस्तूस्थिती नाकारून चालणार नाही. 'टॅक्सी आणि रिक्शा चालक मराठी बोलत नाहीत, त्यांनी महाराष्ट्राप्रती आदर म्हणून मराठी बोलायला हवे', यामध्ये दुमत असण्याचे कारणच नाही; परंतु केवळ धाकदपटशाने हा प्रश्न सुटणारा नाही. महाराष्ट्राच्या विधीमंडळामध्ये मराठी भाषेच्या अस्मितेचा कायदा पारित झाला, त्या विधीमंडळांच्या सभागृहांत नियमित प्रवेश करतांना आमदारांना स्वतःची स्वाक्षरी करून जावे लागते. काही वर्षांपूर्वी शिवसेनेचे आमदार दिवाकर रावते यांनी मराठी अस्मितेच्या प्रश्नावर बोलतांना महाराष्ट्रातील निम्म्याहून अधिक आमदार सभागृहात प्रवेश करतांना इंग्रजीत स्वाक्षरी करत असल्याचे निदर्शनास आणून दिले, म्हणजे सभागृहात मराठी अस्मितेचा कायदा पारित करायचा; मात्र स्वतः इंग्रजीत स्वाक्षरी करून भाषेविषयी अस्मिता दाखवायची नाही. मराठीची दुःस्थिती यामुळेच झाली आहे. मराठीजन अन्य भाषिकांना मराठीत बोलण्याचा आग्रह करतात, तेव्हा त्यांनी प्रथम मराठीची अस्मिता स्वतःच्या बोलण्यातून आणि लिहिण्यातून अंगीकारायला हवी. रिक्शा आणि टॅक्सी चालकांनी मराठी बोलावे, यासाठी कायदा करावा लागतो; परंतु त्यांच्याशी प्रथम हिंदीतून बोलण्यास प्रारंभ करणारे कोण आहेत? मराठी भाषिकांनी मराठीची अस्मिता बाजूला सारल्यामुळेच आज कायदा करण्याची वेळ आली आहे, ही वस्तूस्थिती नाकारून चालणार नाही. महाराष्ट्राची अस्मिता म्हणून मराठी शिकायला हवी, ही आदराची भावना एकवेळ बाजूला ठेवू; परंतु रोजीरोटीसाठी तरी मराठीविना पर्याय नाही, ही आवश्यकता अन्य भाषिकांमध्ये मराठी माणूस निर्माण करू शकला नाही, हे मराठी माणसाचे अपयश आहे.

रिक्शा, टॅक्सी चालकांना मराठी भाषा अनिवार्य करण्याचा महाराष्ट्र शासनाने केलेला कायदा निश्चितच स्वागतार्ह आहे. यामध्ये जे अन्य भाषिक आहेत, त्यांना मराठी शिकवण्यासाठी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतलेली भूमिकाही स्वागतार्ह आहे. याविषयी हिंदी भाषिकांनीही सामंजस्यपणा दाखवायला हवा. मराठी भाषा अनिवार्य करण्याला राजकीय वा अराजकतेचे वळण न देता प्रत्येक राजकीय पक्षांतील हिंदी भाषिक नेत्यांनी कार्यकर्त्यांना मराठी भाषा शिकून घेण्याचे आवाहन करणे आवश्यक आहे. मराठी आणि हिंदी या दोन्हीही भारतीय भाषा आहेत. त्यामुळे राजकीय पक्षांनी राजकारणापलीकडे जाऊन भूमिका घेणे, हिंदी भाषिकांनी मराठीविषयी आदर बाळगणे आणि मराठी माणसाने मातृभाषेविषयी अस्मिता जपली, तर भाषावादाचा हा प्रश्न सुलभ होईल. शेवटी स्वकीय भाषेवरून एकमेकांच्या उरावर बसून वा राष्ट्रीय हानी करणारी आंदोलने करून काय साध्य होणार? राष्ट्रीयत्वाची भावना जोपासली, तर 'अन्यांच्या मातृभाषेचा आदर करा', हे सांगण्याची वेळ येणार नाही; कारण जो स्वतःच्या मातृभाषेचा आदर बाळगतो, तोच दुसऱ्याच्या मातृभाषेचा आदर करू शकतो!

# पित्तामुळे उठणाऱ्या चट्ट्यांवर घरच्या घरीच मिळवा आराम



शरीरावर पित्ताचे चट्टे उमटणे किंवा शरीरावर गांध उमटण्याचा त्रास आपल्यापैकी कितीतरी लोकांना झाला असेल. हे चट्टे उमटले की, त्वचेवर विलक्षण खाज उठायला सुरुवात होते. ही खाज इतकी तीव्र असते की, शरीरावर त्यामुळे जखमा ही होऊ शकतात. पित्तामध्ये तुमच्याही संपूर्ण अंगावर चट्टे उठून आग आग होत असेल तर तुम्हाला झालेला हा त्रास कमी करण्यासाठी काही सोपे घरगुती उपाय आहेत. हे उपाय केल्याने तुम्हाला नक्कीच पित्तावेळी होणारा त्रास आटोक्यात आणता येईल.

आता पित्ताचे चट्टे नेमके कसे असतात हे अनेकांना माहीत नसेल तर पित्ताचे चट्टे लाल असतात. असे चट्टे शरीरातील टॉक्झिक वाढले की येतात. काहींना जर सतत अपचनाचा त्रास असेल तर त्यांना हा त्रास हमखास होतो. या काळात चामडी जाड जाड असल्यासारखी वाटते. सतत खाजवावेसे वाटते.

**पित्तावर गुणकारी इलाज, देतील इटपट आराम**

तुमच्या घरीच तुम्ही या पित्तावर सोपे उपाय करु शकता. तुमच्या किचनमध्ये उपलब्ध असलेल्या काही गोष्टीच त्यावरील उत्तम इलाज आहेत. जाणून घेऊया या गोष्टी नेमक्या कोणत्या

- **कोकम किंवा आमसूल :** आपल्या प्रत्येकाकडे अगदी हमखास किचनमध्ये असणारी गोष्ट म्हणजे कोकम किंवा आमसूल. जर तुम्हाला पित्ताचा त्रास झाला असेल आणि तुमच्याकडे छान ओली कोकमं असतील तर ती थेट तुम्ही तुमच्या चट्टयांवर लावू शकता. शरीरावर आलेली खाज शमवण्यासाठी कोकम हा उत्तम इलाज आहे. आता जर तुम्हाला कोकम त्वचेवर चोळायची नसेल तर तुम्ही कोकमाचा रस घेऊ शकता. कोकमाच्या रसात, भाजलेली जीरा पूड आणि साखर घालून त्याचे सेवन करा तुम्हाला आराम मिळेल.
- **पुदिना :** शीत पित्तावर पुदिनाही खूप छान काम करतो. पुदिन्याच्या रसाचे सेवन केले तरी चालू शकते. किंवा काही पुदिन्याची पाने घेऊन ती छान उकळवून घ्या. उकळवताना त्यामध्ये साखर घाला त्याचा छान काढा तयार होतो. अशा पद्धतीने तुम्हाला पुदिन्याचा काढा बनवून त्याचे सेवन करायचे असते. दिवसातून किमान दोन ते तीनवेळा तरी तुम्हाला याचे सेवन करावे लागते त्यामुळे तुम्हााल छान आराम मिळतो. आता जर तुम्हाला पुदिन्याचा हा काढा प्यायचा नसेल तर तुम्ही पुदिन्याच्या पानांचा नुसता रस काढून जरी अंगाला लावला तरी तुम्हाला आराम मिळतो.
- **हळद :** जर तुम्हाला सतत पित्त उठण्याचा त्रास होत असेल तर तुमच्यासाठी हळद अत्यंत गुणकारी आहे. एका ग्लासात दूध किंवा पाणी घेऊन त्यात हळद घालावी आणि हे हळदीचे पाणी किंवा दूध प्यावे तुम्हाला नक्कीच आराम मिळेल.
- **बडीशेप आणि जीर :** शीत पित्तावर बडीशेप आणि जीरंही खूप गुणकारी आहे. जर तुम्हाला पित्ताचा त्रास असेल तर तुम्ही दररोज याचे सेवन करायला हवे. रात्री साधारण अर्धा चमचा बडीशेप आणि जीरं पावडर (प्रत्येकी) भिजत घाला. सकाळी या पाण्यामध्ये चवीनुसार खडीसाखर घालून हे पाणी उपाशीपोटी प्या तुम्हाला नक्कीच आराम मिळेल.
- **आवळा रस :** शीत पित्तावर आवळा रस ही अत्यंत गुणकारी आहे. तुम्हाला असा त्रास सतत होत असेल तर तुम्ही रोज आवळ्याच्या रसाचे सेवन करा तुम्हाला नक्कीच बरे वाटेल.

आता असे काही सोपे इलाज करुन तुम्ही पित्तामुळे उठणाऱ्या चट्ट्यांचा त्रास कमी करु शकता.

# घरगुती मँगो फ्रुटी

**साहित्य :** पिकलेले आंबे २ मोठे (गोड), कैरी १ छोटी, मध किंवा पिठीसाखर (चवीनुसार), पाणी ४-५ ग्लास, लिंबाचा रस १ छोटा चमचा

**कृती :** आंबे आणि कैरी सोलून, तुकडे करून मिक्सरमधून एकदम मऊ वाटून प्युरी बनवून घ्या. प्युरीमध्ये २ ग्लास पाणी व साखर घालून मध्यम आचेवर १० मिनिटे शिजवा. मिश्रण थोडे थंड झाल्यावर गाळणीने गाळून घ्या. त्यात उरलेले थंड पाणी आणि लिंबू रस (किंवा मध) घालून व्यवस्थित ढवळा. ३-४ तास फ्रीजमध्ये सेट होऊ द्या आणि मग फ्रुटी थंडगार सर्व्ह करा!



# ताकाने मिळवा डागविरहीत त्वचा आणि चमकदार केस



उन्हाळ्याच्या दिवसात ताक हमखास प्यायलं जातं. हे आपल्याला शरीराला थंडावा तर देतंच. पण यासोबतच ताकाचे त्वचा आणि केसांसासाठीही खूप फायदे आहेत. हो..ताक फक्त प्यायल्याने आरोग्याला उपयोगी ठरत असं नाहीतर डागविरहीत त्वचा आणि चमकदार केसांसाठीही तुम्ही ताकाचा वापर करू शकता. कसा ते जाणून घेण्यासाठी वाचा हा लेख.

**त्वचेसाठी कसा कराल ताकाचा वापर**

ताक हे मसूर डाळ, बेसन, गुलाबपाणी आणि मुलतानी माती, संत्र्याच्या सालाची पावडर अशा घटकांसोबत मिक्स करून कोणत्याही प्रकारच्या त्वचा प्रकाराला उपयुक्त ठरू शकतं. खासकरून संत्र्याच्या सालासोबत ताक मिसळून ते चेहऱ्यावरील डागांवर लावल्यास डाग नक्कीच दूर होतील. पपई किंवा टोमॅटोसोबत ताक मिक्स करून लावा आणि ते सुकल्यावर धुवून टाका. चेहऱ्यावरील सनबर्न आणि सन डॅमेज कमी करण्याचा हा उत्तम उपाय आहे.

**केसांसाठी असा करा ताकाचा वापर**

ताकापासून तुम्ही केसांसाठी अनेक उपयुक्त हेअरमास्क आणि पॅक बनवू शकता. एक अंड घ्या आणि ते फेटून त्यात तीन ते चार चमचे ताक, दोन चमचे ऑलिव्ह ऑईल, एक मॅश केलेलं केळं आणि दोन चमचे मध घाला. हे सर्व चांगलं मिक्स करा आणि केसांवर कमीत कमी २० मिनिटं लावा. नंतर केस धुवून टाका. ताकात लिंबाचा रस मिक्स करून १५ मिनिटं मालीश करा आणि मग कोमट पाण्याने केस धुवून टाका. यामुळे केसांतील खाज आणि डँड्रफ दूर होईल. डँड्रफसाठी तुम्ही व्हिनेगर आणि लिंबाच्या रसाची वापरही करू शकता. ताक हे तुम्हाला घरच्याघरी बनवता येतं आणि ते केस व त्वचेच्या आरोग्यासाठी अगदी प्रभावी आणि सोपा उपाय आहे. ताकाच्या मदतीने तुम्ही घरीच फेस आणि हेअरमास्क बनवा आणि तुमच्या त्वचेला व केसांना भरपूर पोषण द्या.

# मखाना खाण्याचे आरोग्यदायी फायदे



मखाना म्हणजे कमळाचे बी. हे खाण्याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. मात्र, याचे सेवन विशेष करुन डाएट करण्यासाठी केले जाते. कारण हल्ली प्रत्येकजण थोड डाएटकडे लक्ष द्यायला लागला आहे. त्यामुळे काही खाण्यापेक्षा थोडे हलके फुलके खाण्याकडे अनेकांचा कल असतो. त्यामुळे भारतात पूर्वापार खाल्ला जाणारा मखाना पुन्हा एकदा डाएटमध्ये सहभागी झाला आहे. मखाना खाल्यामुळे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. मखाना हे हृदय आणि किडनीला हेल्दी ठेवतो. मधुमेहावर मखान एक रामबाण उपाय आहे. मधुमेहावर जर तुम्ही रोज चारच मखाने सकाळी रिकाम्या पोटी खाल्ले तर मधुमेह कमी होतो. उच्च रक्तदाबावरही एक रामबाण उपाय आहे. कारण मखानाचे सेवन केल्याने रक्तदाबावर नियंत्रण राहते. त्यासोबतच मानसिक ताण, राग येणे यावर अंकूश येतो. कारण कमळापासून तयार झालेले थंड बीज आहे. मखानामध्ये व्हिटॅमीन ३ मुबलक प्रमाणात असते. त्यामुळे याचे सेवन केल्यास चेहरा तजेलदार होतो. तसेच सुरकुत्या गायब होण्यास मदत होते. दररोजच्या आहारात किमान २५ ग्रॅम मखाना रोज खायला हवे. बाळंतिणीला पौष्टिक आहार म्हणून खिर, लाडू स्वरुपात खायला देतात. वजन कमी करण्यासाठी आहे, त्यांच्याकरता मखाने खूपच फायदेशीर आहे. कारण याने पोट लवकर भरते. मखान्याच्या सेवनाने अनिद्रा, अस्वस्थ वाटणे, दूर होते.

# उन्हाळ्याच्या दिवसात कैरीचे पन्हे पिण्याचे फायदे

उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले की वेध लागतात ते कैरीच्या पन्ह्याचे. कैरीचे पन्हे हे उन्हाळ्याच्या दिवसात पिण्याचे अनेक फायदे आहेत. हे हंगामी फळ असलं तरीही याचे फायदेही अनेक आहेत. कैरीमध्ये अँटीऑक्सिडंट्स, फायबर, विटामिन्स आणि मिनरल्स यांचे प्रमाण अधिक प्रमाणात असते. याचा खरं तर वेगवेगळ्या प्रकारात आपण वापर करत असतो. कैरीचं लोणचं, मँगो मिल्क शेक, आमरस असे अनेक पदार्थ आपण करतो. पण यापैकी जास्त फायदा होतो तो कैरीच्या पन्ह्याने. हा एक लोकप्रिय पदार्थ आहे. याचा आंबट गौड स्वाद आपल्याला याचे सेवन करण्यास आणि चव घेण्यास नक्की भाग पाडतो. पण तुम्हाला याचे आरोग्याला होणारे फायदे माहीत आहेत का? आम्ही या लेखातून तुम्हाला याचे महत्त्वाचे फायदे सांगणार आहोत. कैरीचे पन्हे पिण्याचे नक्की फायदे काय आहेत हे आपण पाहूया.

**बद्धकोष्ठापासून देते संरक्षण**

कैरीच्या पन्ह्यामध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते ज्याचे सेवन केल्यामुळे तुमचे पचनस्वास्थ्य चांगले राहाते आणि त्यामुळे बद्धकोष्ठतेची समस्या होत नाही. उन्हाळ्याच्या दिवसात आंब्याचे पन्हे प्यायल्याने पोट साफ राहते आणि पोटाचा कोटा साफ राहिल्याने पोटाला त्रास होत नाही.

**मधुमेही रूग्णांसाठी ठरते फायदेशीर**

कैरीच्या पन्ह्यामध्ये नैसर्गिक साखर असते. यामध्ये लॉ ग्लाईसेमिक इंडेक्स असते त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यासाठी याचा फायदा होतो. उन्हाळ्याच्या दिवसात याचे सेवन करण्याने इन्शुलिनची पातळी कमी होत नाही. त्यामुळे मधुमेह न वाढता आरोग्याची काळजी घेण्याचं काम कैरीचे पन्हे करते.

**नैसर्गिक रक्तप्रवाह सुधारतो**

फळांचा राजा समजल्या जाणाऱ्या या आंब्यामध्ये विटामिन सी चे प्रमाण असते. जे आपल्या रक्तप्रवाहासाठी उत्तम ठरते. शरीरातील रक्तसंचार सुधारण्यासाठी तुम्हाला याचा उपयोग करून घेता येतो. कैरीचे पन्हे आपले ब्लड सक्युर्लेशन नीट वाढवते आणि नव्या प्रवाहासाठीदेखील याचा फायदा मिळतो.

**कॅन्सरपासून करते बचाव**

कैरीमध्ये विटामिन सी जास्त प्रमाणात असते ज्यामध्ये अँटिऑक्सिडंट्स असतात. यामुळे कॅन्सरच्या विषाणूंना मारण्याचे काम कैरी करत असते. त्यामुळे आतड्याचा कॅन्सर आणि पोटाचा कॅन्सर न होण्यासाठी आपण कैरीचे पन्हे नेहमी प्यायला हवे. याची अतिशयोक्ती नक्कीच नको मात्र तुम्हाला त्यापासून फायदाही नक्कीच मिळतो.

**त्वचेवर सुरकुत्या येत नाहीत**

यामधील विटामिन सी आणि ए ही पोषक तत्वे आपल्या त्वचेला अधिक चमकदार करण्यासाठी मदत करतात. तसेच तुम्हाला जर चेहऱ्यावर सुरकुत्या नको असतील तर तम्ही कैरीचे पन्हे हे नक्कीच प्यायला हवे. कारण तुमची त्वचा अधिक सुंदर आणि डागविरहीत करण्यासाठी यातील पोषक तत्वे फायदेशीर ठरतात.

**डोळयांसाठीही फायदेशीर**

कैरीच्या पन्ह्यामध्ये विटामिन ए आढळते. हे आपल्या डोळ्यांसाठी फायदेशीर ठरते. कैरीचे पन्हे प्यायल्याने डोळे निरोगी राहतात आणि दृष्टीदेखील चांगली राहते. त्यामुळे डोळ्यांची दृष्टी नीट ठेवायची असेल तर तुम्ही कैरीचे पन्हे नक्की प्या.

**दातांच्या हिरड्या राहतात निरोगी**

कैरीच्या पन्ह्यामध्ये असलेले विटामिन सी हे पोषण देतेच मात्र यामध्ये असलेले पोटॅशियम आणि कॅल्शियम हे दात आणि हिरड्यांच्या निरोगीपणासाठी अधिक फायदेशीर ठरते. तुम्हाला तुमचे दात निरोगी ठेवायचे असतील तर तुम्ही कैरीच्या पन्ह्याचा उपयोग करून घेऊ शकता.

**कच्च्या कैरीच्या स्वादिष्ट रेसिपी करा घरच्या घरी**

**डिहायड्रेट होऊ देत नाही**

उन्हाळ्याच्या दिवस शरीर डिहायड्रेट होण्याची शक्यता जास्त असते. शरीरात योग्य प्रमाणात पाणी जाणेही आवश्यक आहे. पण कैरीच्या पन्ह्यामुळे तुम्ही डिहायड्रेशनपासून वाचता. तसेच हे शरीराला योग्य थंडावा मिळवून देते त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसात याचे सेवन करणे योग्य ठरते.

**प्रतिकारशक्ती वाढवते**

विटामिन सी, विटामिन बी६, विटामिन ए असे सर्व अँटीऑक्सिडंट्स असणारे घटक आपली प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतात आणि हे सर्व घटक आपल्याला कैरीच्या पन्ह्यामध्ये आढळतात. तसेच याचे सेवन आपल्याला अनेक आजारांपासून दूर ठेवण्यासही मदत करतात.

**अस्सल हापूस आंबे ओळखण्याची ही योग्य पद्धत**

**कैरीचे पन्हे कसे तयार कराल**

साहित्य

२-३ कैरी

२ चमचे काळे मीठ

२ चमचे जिरे पावडर

अर्धा चमचा काळी मिरी पावडर

१५-२० पुदीना पाने

१०० - १५० ग्रॅम साखर

**बनविण्याची पद्धत**

- कैरी उकडून घ्या. तुमच्याकडे जर चूल असेल तर कैरी थोडी शेकून मग उकडा (त्याची चव अधिक चांगली लागते)
- त्यानंतर त्याची कोय काढून टाका आणि उकडलेल्या कैरीचा गुदा काढून घ्या
- त्यात साखर, काळे मीठ, पुदीना घालून मिक्सरमधून वाटा
- दुसऱ्या भांड्यात गाळून घ्या
- त्यात काळी मिरी पावडर आणि जिरा पावडर घाला आणि पाणी मिक्स करा
- कैरीचे पन्हे तयार .



# विविध गुणांनी युक्त कडुलिंब

कडुनिंब हे संपूर्ण भारतात आढळणारे, नैसर्गिकरित्या उगवणारे, एक बहुपयोगी झाड आहे. याला लिंबाच्या रंगाची छोटी-छोटी कडू चवीची फळे लागतात म्हणून याचे नाव कडूलिंब. या झाडाची पाने, फळे, बिया, साल, मुळे सर्चव कडू असतात. गुढीपाडव्याच्या शुभ दिवशी याची कोवळी पाने, फुले, लहान कोवळी फळे, जिरे, मिरे, सैंधव मीठ, ओवा, गूळ, हिंग, चिंच हे सर्व एकत्रा वाटून त्याची गोळी करून खातात. कढुलिंबाच्या झाडाची छाया थंड असते. त्या छायेतील घर उन्हाळ्यात थंड राहते.

**गुणधर्म :**

उन्हाळ्यामुळे गोवर, कांजिण्या या सारखे रोग उद्भवतात. अशावेळी रोग्याला कडुनिंबाच्या पानांच्या अंथरुणावर झोपवून मंत्र म्हणत असत.

**औषधी महत्त्व :**

कडुलिंबाचा वृक्ष सगळ्या दृष्टीने औषधी आहे. याची पाने, काडया वाटून, त्याचा रस उन्हाळात प्राशन केल्याने उन्हाचा त्रास होत नाही. काही लोक हा पेलाभर रस रोज पितात. त्यामुळे लठ्ठपणा कमी होतो, सडसडीत माणसे सडसडीतच राहतात. कडुलिंबाच्या काडीने दात घासल्याने दात किडत नाहीत. दातांना बळकटी येते. कडुलिंबाची वाळलेली पाने धान्यात घातल्याने धान्याला कीड किंवा अळी लागत नाही. साबण, सौंदर्य प्रसाधने यात तसेच दंतमंजन, पेस्ट यामध्ये पण कडुलिंबाचा वापर करतात.

कडुलिंबाची झाडे जिथे जास्त प्रमाणात असतात तेथील हवा शुद्ध राहते. या झाडाच्या फळांचा रस काढून त्याचा वापर तेल काढण्यासाठी केला जातो. त्या तेलाचा उपयोग सांधेदुखी कमी होण्यासाठी करतात. मधुमेह या रोगामध्ये कडुलिंब अतिशय ऊपयुक्त आहे. रोज अर्धा कप रस प्यायल्याने मधुमेह नियंत्रित करता येतो.

**यापासून बनणाऱ्या औषधी :**

- कडुलिंब या झाडाची पाने खोबरेल तेलात काळी होईपर्यंत उकळायची आणि ते तेल नियमितपणे लावल्याने केसांची वाढ जोमाने होते. केसांच्या अनेक समस्या दूर होतात.
- पोटात जंत झाले तर पानांचा रस काढून एक चमचा रसात थोडा (अगदी चिंचोक्मयाएवढाच) गूळ घालून तीन दिवस प्याल्यास जंत बाहेर पडतात.
- अंगाला खाज सुटत असेल तर पानाचा रस सर्व अंगाला किंवा आंघोळीच्या गरम पाण्यात दहा -बारा कडुलिंबाची पान ठेचून घालावी.
- ताप आल्यास सकाळ-संध्याकाळ कडुलिंबाच्या सालीच्या काढा घेतात.
- कडुलिंबाची पान जखमेवर कुटून लावल्यास जखम लवकर बरी होते. निबोण्यांचे तेलही औषधी आहे. रक्त दुषित झाल्यावर त्वचेवर डाग पडतात तेव्हा हे तेल लावतात.
- सर्वात महत्त्वाचा उपयोग म्हणजे कडुलिंब हे अत्युत्तम जंतुनाशक आहे. याच्या पानांची पूड शेतात पसरल्यास खत म्हणून उपयोगी तर पडतेच पण त्यापेक्षाही रोपांना किडीपासून दूर ठेवते.



# या स्वादिष्ट सरबतांच्या सेवनाने वाढते रोगप्रतिकारक शक्ती!

उन्हाळा आला रे आला की अंगाची लाही लाही व्हायला सुरुवात होते. जरा कुठे बाहेर गेलं किंवा पंखा बंद केला तर अंगातून घामाच्या धारा व्हायला सुरुवात होतात. अख्खं शरीर पेटून उठतं. या शरीराला शांत करण्यासाठी मग आपण सेवन करतो थंड पदार्थ! ज्यूस म्हणा, थंडावा देणारी फळं म्हणा, एवढचं काय तर फ्रीज मधील पाणी सुद्धा या उन्हाळ्यात अमृतासारखं लागतं. बाकी ताक, आईसक्रिम, लिंबू सरबत या गोष्टी तर आल्याच. पण हे सगळे सामान्य पदार्थ आहेत आणि या पदार्थांमुळे तात्पुरता आराम मिळतो. पण पुन्हा परिस्थिती जैसे थेच होते. खूप गरम होऊ लागतं. घसा कोरड पडू लागतो. उन्हात घामाच्या धारा वाहू लागतात.

पण मंडळी, आम्ही या पदार्थांव्यतिरिक्त आज तुम्हाला काही वेगळ्या पदार्थांबद्दल सांगणार आहोत ज्यांचे सेवन केल्यास तुम्ही उन्हाळ्यात जास्त वेळ स्वतःला हायड्रेट ठेवू शकता.

**लस्सी**

लस्सी तर आपल्या सर्वांनाच माहित आहे. लस्सी हि दुध आणि दही दोन्हींपासून बनवली जाते. लस्सी संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे तिच्या चवीमुळे आणि स्वादामुळे! लस्सी प्यायल्याने मनाला आणि जिभेला जे सुख मिळतं ते अवर्णनीय असतं. तुम्ही तुमच्या आवडीनुसार लस्सीचा स्वाद अधिक वाढवू शकता. यासाठी तुम्ही थंड दुधामध्ये किंवा थंड दहीमध्ये ग्राइंडर टाकून, साखर, गुलाब पाणी सह ते मिश्रण घुसळवून लस्सी बनवलीत तर लस्सीला येणारी टेस्ट हि खूप भारी असते. या शिवाय उन्हामुळे वैतागलेल्या तुमच्या शरीराला थंडावा सुद्धा मिळतो.

**टोमॅटो ज्यूस**

खरतरं उन्हाळ्याच्या काळात तुम्ही टोमॅटोची भाजी खाल्ली नाही पाहिजे. उन्हाळ्यात टोमॅटो खाण्याचा सल्ला डॉक्टर सुद्धा देत नाहीत, कारण त्यात आधीच खूप उष्णता असते. परंतु तुम्ही सलाड किंवा ज्यूस मध्ये या टोमॅटोचा खूप उपयोग करू शकता. यामुळे तुमच्या शरीराला जीवनसत्त्व 'क' आणि लायकोपीन मोठ्या प्रमाणात मिळते. टोमॅटोच्या ज्यूस किंवा सलाड मध्ये लिंबाचा रस किंवा काळे मीठ घालून तुम्ही त्याची चव अजून वाढवू शकता.

**मिल्क शेक**

मिल्क शेक हा असा द्रव्य पदार्थ आहे ज्याला गेल्या काही वर्षात उन्हाळ्याच्या दिवसांत खूप प्रसिद्धी मिळाली आहे. मिल्क शेक बनवण्याच्या पद्धती सुद्धा खूप वेगळ्या आहेत, त्यानुसार त्याची चव बदलत असते, पण तुम्ही कोणताही मिल्क शेक प्यायलात तरी तो तुम्हाला आवडतोच. मिल्क शेक हा सहसा दुध आणि फळांपासून तयार होत असल्याने दुध आणि फळे दोन्हींमधील पोषक तत्वे तुमच्या शरीराला मिळतात. या शिवाय थंडावामुळे शरीराला आराम मिळतो आणि मन प्रफुल्लित सुद्धा होते. त्यामुळे कधी उन्हाळ्यात काही वेगळं खावंस वाटलं तर मिल्क शेक नक्की ट्राय करा.

**डाळींबाचा ज्यूस**

डाळिंब हे एक असे फळ आहे जे आपल्या शरीराला पोषक तत्वे देण्यासाठी महत्त्वपूर्ण मानले जाते, या शिवाय त्याची चव सुद्धा भन्नाट असते. परंतु डाळिंब हे सोलून खाण्यापेक्षा त्याचा ज्यूस करुन पिण्याकडे सगळ्यांचा कल जास्त असतो, कारण डाळींबाचा ज्यूस लागतोच तितका टेस्टी! डाळींबाचा ज्यूस प्यायल्याने शरीरातील हिमोग्लोबिनची मात्रा वाढते, याशिवाय आपली रोगप्रतिकार शक्ती वाढवण्याचे काम देखील हा ज्यूस करतो. उन्हाळ्यात तुमच्या शरीराला लागणारी उर्जेची गरज डाळींबाचा ज्यूस भरून काढू शकतो.

**बदाम दुध**

बदामाचे दुध तयार करण्यासाठी रात्री १२ ते १५ बदाम पाण्यात भिजवून ठेवा. सकाळी उठल्यावर बदामासोबत ५ काजू घ्या आणि एक मुठभर मखाना घेऊन दुधात ग्राइंड करून घ्या. हे तयार झालं तुमचं बदाम दुध! आता यात हवं असल्यास थोडं मध घालून सुद्धा तुम्ही सेवन करू शकता. जर तुम्हाला दुधाचा वापर करायचा नसेल तर दुधा ऐवजी मिनरल वॉटर तुम्ही टाकू शकता किंवा सोया मिल्कचा वापर करू शकता. हे एक असं ड्रिंक आहे जे ना केवळ तुमच्या शरीराला आराम देईल पण तुमचा मेंदू सुद्धा निरोगी ठेवेल.



# शौचालय, बाथरुम ते रेडिओ लॅपटॉप

## तुम्हाला जनगणनेत विचारले जाणार हे प्रश्न... अगोदरच समजून घ्या प्रक्रिया!

1. इमारत क्रमांक (नगरपालिका किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा जनगणना क्रमांक)
2. जनगणना घर क्रमांक
3. जनगणना घराच्या जमिनीचे मुख्य साहित्य
4. जनगणना घराच्या भिंतींचे मुख्य साहित्य
5. जनगणना घराच्या छताचे मुख्य साहित्य
6. जनगणना घराचा वापर (जसे की निवासी, व्यावसायिक)
7. जनगणना घराची स्थिती
8. कुटुंब संख्या
9. कुटुंबामध्ये सर्वसाधारण वास्तव्य करणाऱ्या व्यक्तींची एकूण संख्या
10. कुटुंबप्रमुखाचे नाव
11. कुटुंबप्रमुखाचे लिंग
12. कुटुंबप्रमुख अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतरपैकी आहे का? जन कल्याण
13. जनगणना घराच्या मालकीची स्थिती
14. कुटुंबाच्या पूर्णपणे ताब्यात असलेल्या निवासी खोल्यांची संख्या
15. कुटुंबात राहणाऱ्या विवाहित जोडप्यांची संख्या
16. पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत
17. पिण्याच्या पाण्याच्या स्रोताची उपलब्धता
18. प्रकाशाचा मुख्य स्रोत
19. शौचालयाची उपलब्धता
20. शौचालयाचा प्रकार
21. सांडपाणी निचऱ्याची व्यवस्था
22. स्नानाच्या सुविधेची उपलब्धता
23. स्वयंपाकघराची आणि एलपीजी/पीएनजी जोडणीची उपलब्धता
24. स्वयंपाकासाठी वापरले जाणारे मुख्य इंधन
25. रेडिओ/ट्रान्झिस्टर
26. दूरचित्रवाणी
27. इंटरनेटची उपलब्धता
28. लॅपटॉप/संगणक
29. दूरध्वनी/मोबाइल फोन/स्मार्टफोन
30. सायकल/स्कूटर/मोटारसायकल/मोपेड
31. कार/जीप/व्हॅन
32. कुटुंबामध्ये प्रामुख्याने सेवन केले जाणारे धान्य
33. मोबाइल क्रमांक (केवळ जनगणनेशी संबंधित गनेशी संबंधित संवादासाठी)




■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

आगामी जनगणना 2027 साठी सरकार व्यापक तयारी करत आहे. देशाची 16 वी जनगणना महत्त्वपूर्ण राष्ट्रीय मोहीम असून जनगणना कायदा 1948 च्या तरतुदीअंतर्गत ती संपूर्ण देशभरात राबवली जाईल. आता या जनगणनेत नेमकं काय काय केलं जाणार? नागरिकांकडून कशाची माहिती घेतली जाणार? हे समोर आलो आहे. याबाबतची सविस्तर माहिती सरकारने दिली आहे.

**डिजिटल उपक्रम**

सरकारच्या डिजिटल इंडिया उपक्रमाच्या वचनबद्धतेशी सुसंगत राहून जनगणना 2027 मध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा व्यापक वापर केला जाणार आहे. यामुळे गुणवत्ता, कार्यक्षमता वाढण्याबरोबरच माहिती संकलन वेळेत पूर्ण होईल.

अधिक अचूकता आणि गती साध्य करण्याच्या उद्देशाने, पूर्णपणे डिजिटल माध्यमांद्वारे राबवली जाणारी ही देशाची पहिलीच जनगणना असून डिजिटल कार्यप्रणालीच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण स्थित्यंतर मानले जात आहे .

या प्रणालीमध्ये ह्यरिअल-टाइमह्ण माहिती संकलनासाठी मोबाईल ॲप्लिकेशन्सचा वापर केला जाईल. व्यापक देखरेख, पर्यवेक्षण आणि डेटा व्यवस्थापनासाठी सीएमएमएस (जनगणना देखरेख आणि व्यवस्थापन प्रणाली) हे वेब पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे.

यंदाच्या जनगणनेत ऑनलाईन स्वयं गणना पर्याय उपलब्ध करून देण्यात आला असून याअंतर्गत व्यक्ती स्वतःच आपल्या कुटुंबाची जनगणना प्रश्नावली ऑनलाइन पद्धतीने भरून, पूर्ण करून सादर करू शकते.

**प्रशासकीय पूर्वतयारी :**

जनगणना 2027 साठी राज्यातील सर्व जिल्हे/तालुके / शहरे/गावे यांच्या प्रशासकीय सीमा 1 जानेवारी 2026 ते 31 मार्च 2027 या कालावधीसाठी प्रशासकीय सीमा गोठवण्यात आल्या आहेत, म्हणजेच त्यात कुठलेही बदल करता येणार नाहीत.

महाराष्ट्र शासनाने या संदभार्तील राजपत्र अधिसूचना 15 जुलै 2025 रोजी प्रसिद्ध केली आहे.

त्यानंतर 23 डिसेंबर 2025 रोजी राज्य शासनाने जनगणना अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतची अधिसूचना प्रकाशित केली, याद्वारे क्षेत्रीय कार्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक राज्य/जिल्हा/वैधानिक शहर/तालुका स्तरावरील प्रशासकीय यंत्रणा उभारण्यात आली.

राज्य शासनाने 16 फेब्रुवारी 2026 रोजी खालील 33 प्रश्न अधिसूचित केले आहेत. गृह यादी टप्प्यात लोकांना हे प्रश्न विचारले जातील. यातून घराची स्थिती, सोयी-सुविधा आणि घरगुती मालमत्ता यांविषयीची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया अधिक सुव्यवस्थित होईल.

महाराष्ट्र सरकारच्या निर्णयानुसार महाराष्ट्रात जनगणनेचा पहिला टप्पा म्हणजे ''घर-यादी आणि घरगणना'' साठीच वेळापत्रक खाली दिल्याप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

- स्व-गणना : 1 मे ते 15 मे 2026
- घर-यादी आणि घरगणना : 16 मे ते 14 जून 2026

या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी तसेच राज्यभरात जनगणनेशी संबंधित उपक्रम सुरु करण्याच्या उद्देशाने 26 फेब्रुवारी 2026 रोजी राजपत्रित अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

क्षेत्रीय पदाधिकारी तैनात करण्यात आले आहेत.

या व्यापक घरगणना तयार करण्याच्या कामासाठी राज्यभरात सुमारे 2.64 लाख क्षेत्रीय अधिकारी म्हणजेच प्रगणक आणि पर्यवेक्षकांना (10% राखीव कर्मचाऱ्यांसह) प्रशिक्षण दिले जाईल आणि प्रत्यक्ष जणगणनेसाठी तैनात केले जाईल.

याव्यतिरिक्त हे कार्य वेळेत पूर्ण करण्याच्या उद्देशाने तांत्रिक सहायक आणि विविध कार्यकुशल कर्मचाऱ्यांना राज्य, जिल्हा, वैधानिक शहरे आणि तहसील स्तरावर नियुक्त करण्यात आले आहे.

भारताचे रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त यांच्या कार्यालयाने निर्देशित केलेल्या प्रशिक्षण शृंखलेनुसार प्रशिक्षणाचे पाच स्तर निश्चित करण्यात आले आहेत. सर्वप्रथम, भारताचे रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त यांच्या कार्यालयामधील विषय तज्ज्ञांनी राज्य जनगणना संचालनालयांमधील राष्ट्रीय प्रशिक्षकांना प्रशिक्षण दिले आहे.

दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रातील 141 मास्टर प्रशिक्षकांना (राज्य सरकारचे 115 आणि जनगणना कार्यालय, महाराष्ट्र येथील 26) पुण्यात यशदा अर्थात यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमी येथे दिनांक 9 ते 17 मार्च 2026 या कालावधीत प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणात जनगणना कार्य संचालनालय, महाराष्ट्र, येथील 5 राष्ट्रीय प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर झालेल्या प्रशिक्षणात 6 ते 17 एप्रिल 2026 या कालावधीत सर्व जिल्हा/वैधानिक शहरांमधील मुख्यालयात 3,850 क्षेत्रीय प्रशिक्षणार्थीना मास्टर प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण देण्यात आले.

शेवटच्या टप्प्यात 23 एप्रिल ते 8 में 2026 या कालावधीत क्षेत्रीय प्रशिक्षक सुमारे 2.64 लाख प्रगणक 2.64 लाख प्रगणक आणि पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

आणि पर्यवेक्षकांना प्रशिक्षण दे हे प्रगणक आणि पर्यवेक्षक प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाजात सहभागी होतील आणि ह्यघर-यादी आणि घरगणना 'म्हणजे ह्यएच एल ओ' मोबाईल ॲप्लिकेशन मध्ये माहिती संकलित करतील.

**माहितीची सुरक्षितताः**

मोबाईल स्तरावर, डेटा प्रेषणाच्या दरम्यान तसेच सर्व्हर स्तरावर अशी त्रिस्तरीय सुरक्षा प्रणाली समाविष्ट करण्यात आली आहे.

केवळ नियुक्त अधिकाऱ्यांनाच पासवर्ड आणि ओटीपी द्वारे या माहितीचा एक्सेस दिला जाईल आणि डेटा एनक्रिप्टेड स्वरूपात संग्रहित केला जाईल.

ISO/IEC 27001:2022 प्रमाणित डेटा सेंटर्सना महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा म्हणून घोषित करण्यात आले आहे आणि नामांकित संस्थांमार्फत सुरक्षा ऑडिट केले जात आहे.

**जनगणनेमधील लोकांची भूमिका**

राज्याचा सर्वांगीण विकास आणि प्रगतीमध्ये योगदान देण्याच्या उद्देशाने तसेच परिणामकारक धोरण निर्मितीसाठी विश्वसनीय डेटा किंवा माहिती संकलित करण्यात लोकांचा सक्रिय सहभाग अतिशय आवश्यक आहे.

महाराष्ट्र सरकारने 9 एप्रिल 2026 रोजी एक राजपत्रित अधिसूचना जारी करुन राज्यातील नागरिकांना भारताच्या जनगणना 2027 मध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे तसेच या राष्ट्रीय हिताच्या महत्त्वपूर्ण कार्यात योगदान देण्याचे आवाहन केले आहे. प्रत्यक्ष क्षेत्रीय भेटीत घरोघरी येणाऱ्या जनगणना अधिकाऱ्यांना अचूक आणि वेळेवर माहिती देऊन संपूर्ण सहकार्य करण्यासाठी लोकांना प्रोत्साहित केले जात हे 27 साल

स्वगणना करणाऱ्या नागरिकांनी हे सुनिश्चित करावे की ते https://se.census.gov.in या योग्य युआरएल ॲड्रेसलाच भेट देत आहेत तसेच ज्या एसएमएस/ई-मेल श्रेणीतून वन टाइम पासवर्ड (ओटीपी) प्राप्त झाला आहे, त्या श्रेणीचे वर्णन योग्य असल्याची खात्री करावी आणि इतर कोणत्याही श्रेणीतून प्राप्त झालेल्या रटर ला प्रतिसाद देऊ नये. एसएमएस /ओटीपी द्वारे प्राप्त झालेल्या जनगणनेशी संबंधित सर्व संदेशांमध्ये प्रेषकाच्या नावात RGICEN हा कीवर्ड असतो, उदा. AD-RGICEN-S, BD-RGICEN-S, RGICEN-G, JK-RGICEN-G इत्यादी.

# नाशिकमध्ये वृक्षतोडीवर १९ जूनपर्यंत स्थगिती कायम

## पूर्वपरवानगीशिवाय तोड बंद, महापालिकेला धक्का

■ **नाशिक। प्रतिनिधी,**

शहरातील वृक्षतोड प्रकरणात राष्ट्रीय हरित लवाद (एनजीटी) ने नाशिक महानगरपालिकेला मोठा धक्का देत वृक्षतोडीवरील स्थगिती १९ जूनपर्यंत कायम ठेवली आहे. तसेच, अत्यावश्यक परिस्थितीतही वृक्षतोड करण्यापूर्वी लवादाची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य ठरविण्यात आले आहे.

'मनीष बाविस्कर विरुद्ध नाशिक महानगरपालिका' या प्रकरणात स्थगिती उठवण्यासाठी महापालिकेकडून मोठी कायदेशीर लढाई उभी करण्यात आली होती. दिल्लीहून वकिलांची टीम नियुक्त करण्यात आली होती, तर काही हस्तक्षेप अर्जही दाखल करण्यात आले होते. मात्र, याचिकाकर्ते मनीष बाविस्कर यांच्या वकिलांनी या हस्तक्षेप अर्जांना तीव्र विरोध केला. संबंधित अर्जदार महापालिकेच्या पाठबळावर काम करत असून न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा युक्तिवाद करण्यात आला. हा युक्तिवाद ग्राह्य धरत लवादाने दोन्ही हस्तक्षेप अर्ज फेटाळून लावले.



**मराठी सक्तीमागे भाषा प्रेम की राजकारण?**

महापालिकेने संभाव्य अपघात टाळण्यासाठी झाडतोडीवर काही सवलत देण्याची मागणी केली होती. मात्र, लवादाने त्यास नकार देत स्पष्ट केले की, आपत्कालीन परिस्थितीतही वृक्षतोड किंवा फांद्या छाटण्यासाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा लागेल. दरम्यान, ७ एप्रिलनंतर झालेल्या वृक्षतोडीला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना लवादाने महापालिका आयुक्त मनीषा खत्री, उद्यान अधिकारी विवेक भदाणे आणि संबंधित अधिकाऱ्यांना दोन आठवड्यांत स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी १९ जून रोजी होणार असून, याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. श्रीराम पिंगळे आणि ॲड. विकास अग्रवाल यांनी बाजू मांडली.

# अत्याचार करुन चार वर्षाच्या चिमुकलीला संपवलं

## धक्कादायक घटनेनं भोर हादरलं, नराधम पोलिसांच्या ताब्यात


■ **पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यातील भोर तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. भोर तालुक्यातील एका गावात एका चार वषार्चा चिमुकलीवर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. यानंतर आरोपीने चिमुरडीची हत्या केली आहे.

या घटनेनंतर मुलीचा मृतदेह पोलीस स्टेशनच्या बाहेर ठेवण्यात आला आहे. गावकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन सुरु केलं आहे. कृत्य करणाऱ्या नराधमाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

**आरोपीने अत्याचार करुन दगडाने चिमुकलीची हत्या केल्याची माहिती**

आरोपीने अत्याचार करुन दगडाने चिमुकलीची हत्या केल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. 65 वर्षीय नराधमाने अत्याचार केल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, स्थानिकांच्या म्हणण्यानुसार एका 65 वर्षीय व्यक्तीने, घरासमोर खेळणाऱ्या चिमुकलीला गोठ्यात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार



करून, दगडाने ठेचून तीचा खून केल आणि नंतर तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली झाकून ठेवला होता. दुपारी चिमुकली न दिसल्यानं तिची शोधाशोध केल्यानंतर चिमुकली गोठ्यात मृत अवस्थेत आढळली. त्यानंतर परिसरातले ३५ फुटेज चेक केल्यानंतर आरोपी चिमुकलीला गोठ्याच्या दिशेने घेऊन जाताना दिसला त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार ही चिमुकली आजीच्या घरी सुट्टीला आली होती.

**घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली**

पुणे जिल्ह्यात एक हादरवणारी घटना घडली आहे. भोर तालुक्यात एका चार वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करुन तिला संपवलं आहे. या घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली आहे. आरोपीने दगडाने चिमुरडीची हत्या केल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी मुलीचा मृतदेह पोलीस स्टेशनच्या बाहेर ठेवला आहे. गावकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन सुरु केलं आहे. दरम्यान, या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. गावातील ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. त्यांनी चिमुकलीचा मृचदेह थेट पोलिस स्टेशनच्या बाहेर नेला आहे. त्याठइकाणी रास्ता रोको आंदोलन सुरु केलं आहे.

# भारतीय लष्कराच्या देवळाली कॅम्प रुग्णालयात ८२ लाखांच्या इन्शुलिनची चोरी

■ **नाशिक। प्रतिनिधी,**

देवळाली कॅम्प परिसरातून धक्कादायक घटना समोर आली आहे. भारतीय लष्कराच्या देवळाली कॅम्प येथील मिलिटरी हॉस्पिटलमध्ये जवानांच्या उपचारासाठी पाठविलेल्या तब्बल ८१ लाख ९९ हजार रुपयांच्या महागड्या ह्यइन्शुलिनह्ण इंजेक्शन्सची चोरी करून त्यांचा काळाबाजार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धक्कादायक म्हणजे, दोन वर्षांच्या अंतर्गत तपासानंतर या प्रकरणाचा छडा लागला असून, यात एका निलंबित लष्करी शिपायाचा आणि एका सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचा मुख्य सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

**नेमकी घटना काय?**

मुंबईतील कांदिवली येथील आर्मीच्या मेडिकल स्टोअर डेपोतून मे २०२४ मध्ये देवळाली कॅम्प येथील मिलिटरी हॉस्पिटलसाठी १३३ बॉक्समध्ये विविध प्रकारची औषधे




पाठवण्यात आली होती. यामध्ये मधुमेह नियंत्रित करण्यासाठी वापरली जाणारी अत्यंत महागडी 'इन्शुलिन डेग्लुडेक' आणि 'ह्युमन इन्शुलिन' अशी एकूण बारा हजार ६६२ इंजेक्शन्स होती. या औषधांची सुरक्षित ने आण करण्याची जबाबदारी संबंधित विभागावर असताना, संशयित नीरजने संगनमत करून ही औषधे परस्पर लंपास केली.

तत्कालीन लष्करी शिपाई नीरज सिंग (सध्या निलंबित) आणि सेवानिवृत्त कर्मचारी संशयित विनायक विठ्ठल कांबळे यांनी ही औषधे मिलिटी हॉस्पिटलमध्ये जमा करण्याऐवजी देवळाली कॅम्पच्या बनात चाळीतील घरी उतरवली. तेथे औषधांचे मूळ बॉक्स फोडून त्यांची पुन्हा 'रि-पॅकिंग' केली. ही औषधे टाटा एस टेम्पोतून (एमएच १५ जेसी ६१८१) पुण्यातील कलाशंकर नगरातील नीरज सिंग याच्या घरी पाठवण्याचा कट रचल्याचे आर्मी इंटेलिजन्सच्या तपासात समोर आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीनिवास देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आता प्रकरणाच तपास गुन्हे शोध पथकाकडे वर्ग करण्यात आला आहे.

**जप्त औषधांचा तपशील**

- ५२ लाख १३ हजार रुपये किमतीचे १० हजार ६९८ नग ह्यूमन इन्शुलिन
- १५ लाख ९७, हजार १२० रुपये किमतीचे ९७२ नग इन्शुलिन
- १३ हजार ८८ हजार ८०० रुपये किमतीचे ९९२ मग इन्शुलिन
- एकूण रक्कमः ८१ लाख ९९ हजार रुपये

**दोन वर्षांच्या तपासानंतर कारवाई**

या चोरीचा संशय आल्यानंतर लष्करी गुप्तचर यंत्रणा आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मागील दोन वर्षे या प्रकरणाचा पाठपुरावा केला. देवळालीतील हॉस्पिटलचे सिनिअर रजिस्ट्रार कर्नल दविंदर भारद्वाज यांच्या सूचनेनुसार सुभेदार रामराव निवृत्ती शिंदे यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार नीरजसह कांबळेवर गुन्हा नोंद झाल आहे.

# 'मला तुझी छाती...' नाशिकमध्ये चाललंय काय? खरात, आयटी कंपनीनंतर शाळेत शिक्षकाकडून मुलीचा विनयभंग



■ **नाशिक। प्रतिनिधी,**

भोंदू अशोक खरात प्रकरणापाठोपाठ नाशिकमधून मल्टी नॅशनल कंपनीमध्ये धर्मांतराच्या नावाखाली महिलांवर करण्यात आलेल्या अत्याचाराची प्रकरण राज्यभरात चर्चेत आहेत. असं असतानाच आता नाशिक जिल्ह्याला शमेर्नं मान खाली घालायला लावणारी विचित्र घटना इगतपुरीमध्ये घडली आहे. शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणाऱ्या या प्रकरणामध्ये एका शिक्षकाला अटक करण्यात आली असून त्याने एका अल्वयीन मुलीसमोर अश्लील चाळे केल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

**नेमकं घडलं काय?**

इगतपुरी तालुक्यात सर्वतीर्थ टाकेद येथील एका शाळेत हा सारा धक्कादायक प्रकार घडला आहे. येथे आठवीच्या विद्यार्थिनीचा शिक्षकाने विनयभंग केल्याचा प्रकार समोर आल्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. पीडित मुलगी भावासोबत शालेय कागदपत्रांवर मुख्याध्यापकांचा सही शिक्का घेण्यासाठी गेली होती. 'मुख्याध्यापक बैठकीत असून मी सही शिक्के घेऊन देतो,' असे सांगत आरोपी शिक्षकाने पीडितेच्या भावाला खोलीबाहेर उभे करून पीडितेला आतमध्ये खोलीतील कक्षात नेले.

**शिक्षकाने कक्षात काय केलं?**

कक्षात इतर कोणीही नसल्याची संधी घेत आरोपी शिक्षकाने मुलीला लज्जा उत्पन्न होईल असे हावभाव केले. 'मला तुझी छाती दाबू देत का?' असा प्रश्न विचारत आरोपी शिक्षकाने या अल्पवयीन मुलीसमोर अश्लील भाषा वापरली. शाळेतील शिक्षकानेच विद्यार्थिनीचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. घडलेल्या प्रकराने घाबरलेल्या पीडित मुलीने तिथली कागदपत्रं हातात घेत ताबडतोब तिथून पळ काढला.

**खुलासा कसा झाला?**

पालक घरी आल्यावर पीडित मुलगी रडत असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. रडायला काय झालं अशी विचारपूस करत त्यांनी तिला विश्वासात घेतलं तेव्हा तिने रडत राहा प्रकार पालकांना सांगितला. सारा संतापजनक प्रकार ऐकून पीडितेचे पालक व गावातील लोकांनी तात्काळ शाळा गाठली आणि संबंधित शिक्षकाबरोबरच शाळा प्रशासनाला जाब विचारला. घोटी पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेत तत्काळ संशयित शिक्षकास ताब्यात घेतले आहे.

**यापूवीर्ही या शाळेत घडलेला असाच प्रकार**

मागील वर्षी याच शाळेत 13 वर्षीय विद्यार्थिनीवर मुख्याध्यापकाने अत्याचार केल्याची घटना घडली होती. सलग दुसऱ्यांदा शाळेत अशी घटना घडल्याने परिसरात संतापाचे वातावरण आहे. घोटी पोलिस स्थानकात आरोपी शिक्षकाविरुद्ध पोस्को व विविध कलमाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पालकांनी संवाद साधणं महत्त्वाचं**

शालेय मुलांसोबत शाळेत होणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांबद्दल पालकांनी जागृक राहणं आवश्यक असल्याचं या क्षेत्राशी संबंधित समोपदेशक सांगतात. पालकांनी मुलांसोबत मनमोकळेपणे संवाद केला पाहिजे. असं झालं तर शाळेत घडलेल्या छोट्या-मोठ्या गोष्टी पालकांसोबत शेअर करतात आणि अशा घटना घडल्या तर त्याची वाच्यता होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com